अंतरंग

पनवेलमध्ये डेंग्यू, मलेरिया रोखण्यासाठी उपाययोजना/३

खारघरमध्ये रंगली गणपती बनवण्याची कार्यशाळा/६

आयसीसी वनडे क्रमवारीत शुबमन, कुलदीपची मुसंडी/८



रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक ६०

www.ramprahar.com

शुक्रवार, १५ सप्टेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २



तुमचा स्वतः चा म्युच्युअल फंड वितरण व्यवसाय सुरू करा !

NJ WEALTH

आणि अमर्यादित उत्पन्न (INCOME) मिळवा...

NJ वेल्थसह म्युच्युअल फंड वितरक व्हा!

भारतातील सर्वात मोठ्या म्युच्युअल फंड वितरकांपैकी एक.

उत्तम कमाईची संधी. विमा सल्लागार, रिअल इस्टेट ब्रोकर, सेवानिवृत्त कर्मचारी व गृहिणींसाठी उत्तम कमाईची संधी.

NJ Wealth

पत्ता :- प्लॉट क्र. 151, पहिला मजला, पाटील कॉम्प्लेक्स, मिडल क्लास सीएचएस, शिवाजी चौकाजवळ, पनवेल, जि. रायगड. पनवेल.

JITENDRA PATEL (9820892225), PRAJWAL JADHAV (9324599054), SHRUTI SHINDE (9967457126)


## मनोज जरांगे-पाटील यांच्या
# उपोषणाची अखेर सांगता

### मराठा आरक्षणासाठी सरकार कटिबद्ध -मुख्यमंत्री



**मुंबई : प्रतिनिधी**

मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचा पुनरूच्चार करतानाच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यात सामाजिक सलोखा, शांतता राखावी, असे आवाहन केले आहे. मुख्यमंत्र्यांनी गुरुवारी (दि. १४) जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी येथे आंदोलनकर्ते मनोज जरांगे-पाटील यांची भेट घेतली. त्या वेळी ते बोलत होते. मुख्यमंत्र्यांच्या ग्वाहीनंतर त्यांच्याच हस्ते सरबत घेऊन जरांगे-पाटील यांनी उपोषण सोडले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन जरांगे-पाटील आणि मराठा आरक्षण आंदोलकांच्या बहुतांश मागण्यांबाबत शासन ठोसपणे कार्यवाही करीत असल्याची माहिती दिली. त्याचप्रमाणे सारथी संस्था तसेच अण्णासाहेब आर्थिक मागास विकास महामंडळाबाबत करण्यात आलेल्या मागण्यांवर तातडीने कार्यवाही केली जाईल, असे जाहीर केले.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, सरकारची भूमिका अतिशय स्पष्ट आहे. यापूर्वीही सरकारने मराठा समाजाला १६ ते १७ टक्के आरक्षण दिले होते. हे आरक्षण उच्च न्यायालयातदेखील टिकले होते, पण ते पुढे सर्वोच्च न्यायालयात रद्द झाले. ते का झाले, कसे झाले याची चर्चा अनेकदा झाली आहे. त्याची माहिती जरांगे यांच्यासह सर्वांनाच आणि आंदोलकांनाही आहे. याबाबत परवा रात्री आपल्या शिष्टमंडळाशीही चर्चा केली आहे.

आपल्याला मराठा आरक्षण मिळाले होते. सर्वोच्च न्यायालयात हे आरक्षण रद्द झाल्यानंतर आपण ज्यांच्या मुलाखती झाल्या होत्या अशा पात्र सुमारे तीन हजार ७०० उमेदवारांना अधिसंख्य पदे निर्माण करून त्यांना नियुक्त्या दिल्या आहेत. त्या वेळेस या नोकऱ्या देण्याचे धाडस सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे कोणी करीत नव्हते. ते धाडस आम्ही केले आहे. पुढेही यावर काय होईल त्याला तोंड देण्याची जबाबदारी आम्ही तयारी ठेवली आहे. मराठा समाजाला ओबीसी समाजाप्रमाणेच सुविधा देण्यात येत असल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिली.

# जल जीवन मिशन योजना अर्धवट ठेवणाऱ्या ठेकेदारांना काळ्या यादीत टाका

## आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांची सीईओंना सूचना

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल, उरण आणि खालापूर तालुक्यात सुरू असलेल्या जल जीवन मिशन योजना रखडल्या आहेत, कारण एकच ठेकेदार अनेक ठिकाणी असून ते काम करीत नाही. सरपंच किंवा अधिकाऱ्यांचे फोनही घेत नाही. काही ठिकाणी त्यांनी पोट ठेकेदार नेमले आहेत. तेदेखील काम करीत नाहीत. त्यामुळे ही योजना वेळेत पूर्ण होण्यासाठी अशा ठेकेदारांना काळ्या यादीत टाकून नवीन ठेकेदार नेमावा, अशी सूचना गुरुवारी (दि. १४) पनवेल येथे झालेल्या आढावा बैठकीत आमदार प्रशांत ठाकूर व महेश बालदी यांनी जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अधिकाऱ्यांना दिल्या.

जल जीवन मिशन योजनेच्या कामांबाबत पनवेल, उरण आणि खालापूर तालुक्यातील सरपंच व नागरिकांच्या तक्रारी आल्याने आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी रायगड जि.प.चे कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांना आढावा बैठक घेण्यास सांगितले होते. त्यानुसार पनवेल येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या हॉलमध्ये झालेल्या या बैठकीला आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, जि.प.चे सीईओ डॉ. भरत बास्टेवाड, पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता वेंगुर्लेकर, पनवेलचे गटविकास अधिकारी संजय भोये, भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, सरपंच, ग्रामसेवक व ठेकेदार उपस्थित होते.



या वेळी तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायत हद्दीतील जल जीवन मिशन योजनेचा आढावा घेण्यात आला. २०२२मध्ये कामाची वर्कऑर्डर निघूनही अद्याप काम सुरू नाही, तर काही ठेकेदारांनी काम सुरू करून बंद केले आहे. फक्त पाईप आणून ठेवले आहेत. काहींना रक्कम वाढवून पाहिजे, तर काहींनी ८० टक्के रक्कम घेऊन पुढील काम बंद केले असल्याचे निदर्शनास आले. अनेक ठेकेदार निविदा मंजूर झाल्यापासून त्या गावात गेलेलेच नाहीत. काही फक्त एकदाच जाऊन आले आहेत. ते सरपंच, ग्रामसेवक किवा अभियंत्यांचे फोन घेत नसल्याच्या तक्रारी या वेळी करण्यात आल्या. काही ठेकेदारांनी आजची बैठक लावल्यावर एक दिवस येऊन काम केल्याचे दिसून आले, तर अनेक ठेकेदार बोलावूनही या बैठकीला आले नाहीत.

काही गावात पाण्याच्या टाकीसाठी जागा दिली नसल्याचे दिसून आले. त्याबाबत अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींसोबत चर्चा करून तो प्रश्न सोडवावा, असे सांगण्यात आले. वनखात्याच्या जागेचा प्रश्न डॉ. बास्टेवाड यांनी सोडवला असल्याने तेथील काम ताबडतोब सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या. या वेळी आमदार महेश बालदी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची महत्त्वाकांक्षी जल जीवन मिशन योजनेचे काम रखडवणाऱ्या ठेकेदारांना कायमस्वरूपी शासनाच्या काळ्या यादीत टाकण्याची मागणी केली. जनतेशी असे खेळणाऱ्या ठेकेदारांना अद्दल घडवणे गरजेचे असल्याचे सांगून लगेच नवीन ठेकेदार नेमून काम सुरू करावे, असे सांगितले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी न्हावा गावात पाण्याच्या टाकीसाठी जागा उपलब्ध नाही. अधिकाऱ्यांनी योजना बनवताना स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता जागा ठरवल्याने असे प्रकार घडले आहेत. त्या ठिकाणी जाऊन पाहणी करून जागा ठरवण्याची सूचनाही त्यांनी केली. त्याचप्रमाणे शेडुंगमध्ये गावकऱ्यांनी जय मल्हार सोसायटीला योजनेतून पाणी देण्यास विरोध करणे बरोबर नाही. पनवेल-उरण तालुक्यात मोठ्या प्रमाणात नागरी वस्ती वाढत आहे. गावात बिल्डिंग झालेली चालते, पण त्यांना पाणी देणार नाही अशी भूमिका घेणे योग्य नाही, असे ते म्हणाले.

डॉ. भरत बास्टेवाड यांनी काम न करणाऱ्या ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्याच्या तसेच काहींना १५ दिवसांची मुदत देऊन काम न सुरू केल्यास त्यांना बदलण्याची सूचना अधिकाऱ्यांना दिली.

### अशी आहे योजना

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जल जीवन मिशनची १५ ऑगस्ट २०१९ रोजी घोषणा केली. सरकारने २०२४पर्यंत देशातील सर्व ग्रामीण कुटुंबांना नळजोडणीद्वारे पुरेसे व सुरक्षित पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी जल जीवन मिशन सुरू केले. या योजनेंतर्गत प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला प्रतिव्यक्ती ५५ लिटर पाणी दिले जाते. याची घोषणा झाल्यापासून आतापर्यंत सहा कोटींहून अधिक कुटुंबांना नळाच्या पाण्याची जोडणी देण्यात आली आहे.

| योजनेची सद्यस्थिती | पनवेल | उरण |
| --- | --- | --- |
| मंजूर झालेल्या | १३१ | २० |
| प्रगतिपथावर | ८४ | ९ |
| काम सुरू होऊन बंद | १८ | ३ |
| सुरूच न झालेल्या | २७ | ७ |
| पूर्ण | ०० | १ |

# आमदार अपात्रतेची सुनावणी लांबणीवर

## कागदपत्रे परस्परांना सोपविण्यासाठी दोन आठवड्यांची मुदत

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेनेतील उठावानंतर आमदारांच्या अपात्रतेचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे सोपवले. त्यानुसार अध्यक्षांनी सर्व आमदारांना नोटीस बजावत आपले म्हणणे मांडण्याची सूचना केली होती. या प्रकरणावर गुरुवारी (दि. १४) सुनावणी झाली. या सुनावणीत दोन्ही गटांना एकमेकांची कागदपत्रे उपलब्ध व्हावीत यासाठी अध्यक्षांनी दोन आठवड्यांची वेळ दिली आहे.

विधिमंडळाच्या मध्यवर्ती सभागृहात सुनावणीची प्रक्रिया घेण्यात आली. ठाकरे गटाचे नेते सुनील प्रभू यांनी दाखल केलेली कागदपत्रे आम्हाला मिळावीत, अशी मागणी शिंदे गटाचे वकील अनिल सिंग यांनी केली. या मागणीनुसार आता दोन्ही गटांना दोन आठवड्यांची वेळ देण्यात आली आहे.

लेखी उत्तर सादर करण्यासाठी शिंदे गटाच्या आमदारांना मुदतवाढ देण्यात आलेली आहे. शिंदे गटाची ही महत्त्वपूर्ण मागणी पूर्ण झाली आहे तसेच दोन्ही गटांना एकमेकांची कागदपत्रे मिळावीत यासाठी दोन आठवड्यांची वेळ देण्यात आली आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ही मुदतवाढ दिली आहे.

सुनावणीवेळी सुप्रीम कोर्टातील ज्येष्ठ वकील देवदत्त कामत आणि वकील असिम सरोदे यांनी ठाकरे गटाकडून बाजू मांडली, तर शिंदे गटाकडून वकील अनिल सिंग यांनी युक्तिवाद केला. तब्बल ३४ याचिकांवर विधानसभा अध्यक्षांना सुनावणी करायची आहे. प्रत्येक याचिकेची वेगळी सुनावणी केली जाणार आहे. लेखी उत्तर दाखल करण्यासाठी आणि कागदपत्रे उपलब्ध होण्यासाठी अध्यक्षांनी आता दोन आठवड्यांची वेळ दिली आहे. त्यामुळे अंतिम सुनावणीस वेळ लागण्याची शक्यता आहे.

# मुंबई विमानतळावर खासगी विमान कोसळले

**मुंबई : प्रतिनिधी**



मुंबई विमानतळावर गुरुवारी (दि. १४) एक खासगी विमान कोसळले. या विमानातून आठ जण प्रवास करीत होते. खराब हवामानामुळे हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

अपघातग्रस्त विमान विशाखापट्टणम ते मुंबई असे येत होते. या विमानात सहा प्रवासी आणि दोन क्रू मेंबर्स एकूण आठ जण होते. मुंबई विमानतळावर लँडिंगच्या वेळी कोसळून त्याचे दोन तुकडे झाले व आग लागली. या अपघातानंतर विमानतळावरील वाहतूक थांबवून बचावकार्य सुरू करण्यात आले.

# भाजपची दक्षिण रायगड जिल्हा कार्यकारिणी जाहीर

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मान्यतेने दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांनी दक्षिण जिल्हा कार्यकारिणी जाहीर केली आहे.

जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांनी दक्षिण रायगडमध्ये भाजपचे विचार पोहचविण्यासाठी खंद्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करून त्यांच्यावर पक्षवाढीच्या दृष्टीने जबाबदारी देऊ केली आहे. २०२४ लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने रणनीती आखण्यास सुरुवात केली असून रायगड लोकसभा मतदारसंघातील दक्षिण रायगड जिल्ह्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अपेक्षित कार्य करण्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे.

भाजप दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीसपदी ॲड. महेश मोहिते, मिलिंद पाटील, बिपीन म्हामुणकर, गीता पालरेचा, प्रशांत शिंदे; उपाध्यक्षपदी दिलीप भोईर, वैकुंठ पाटील, मनोज भागवत, राजेश मपारा, मंगेश दळवी, भालचंद्र महाले, आलप मेहता, जयवंत अंबाजी, पल्लवी तुळपुळे, श्रेया कुंटे, रश्मी वाझे; चिटणीसपदी विठ्ठल शिंदकर, चंद्रकांत घोसाळकर, मनोज गोगटे, सतिश लेले, परशुराम म्हात्रे, महेंद्र चौलकर, वासुदेव म्हात्रे, प्रकाश रायकर, श्रद्धा घाग, वैशाली मपारा, नीलिमा भोसले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. (पान २ वर..)







# गणेशोत्सव मंडळांना पाच वर्षांसाठी एकदाच घ्यावी लागणार परवानगी

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश; मंडळांना दिलासा

**मुंबई : प्रतिनिधी**

उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांना पुढील पाच वर्षांकरिता उत्सवासाठी एकदाच परवानगी घ्यावी लागणार आहे. अशी परवानगी देण्याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आला होता.



या निर्णयामुळे गत १० वर्षांत सर्व नियम, कायद्यांचे पालन करणाऱ्या, कोणत्याही तक्रारी नसलेल्या उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांना दिलासा मिळाला आहे, तसेच त्यांना आगामी वर्षांसाठी आणखी उत्कृष्ट नियोजन करता येणार आहे. उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांना प्रोत्साहन मिळावे यासाठी पुढील पाच वर्षाकरिता एकदाच परवानगी देण्याबाबत मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत मागणी करण्यात आली होती. या वेळी एका याचिकेवर उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांकडेही लक्ष वेधण्यात आले होते. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या निर्देशानुसार नगर विकास विभागाने शासन निर्णय जाहीर केला आहे. या निर्णयानुसार या वर्षीच्या १९ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात शासन नियमांचे व कायद्यांचे पालन करणाऱ्या उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांना पुढील पाच वर्षांकरिता परवानगी देण्याची कार्यवाही सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व नगरपंचायती यांना करावी लागणार आहे. महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायती यांच्या मालकीच्या जागेवर गणेशोत्सव मंडळांना गणेशोत्सव साजरा करण्यासाठी जागा देतांना नाममात्र असे शंभर रुपये भाडे घेता येईल, तसेच उत्सवाकरिता यापूर्वी वेळोवेळी विहित केलेल्या शासन निर्णय, आदेश यानुसार अटी, शर्तीचे मंडळांना पालन करावे लागेल. मंडळांना स्थानिक पोलीस स्टेशन यांच्याकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून ऑनलाईन माध्यमातून संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांकडे परवानगीसाठी अर्ज करावा लागणार आहे.

## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात विविध स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात प्रधानमंत्री पोषण योजनेंतर्गत आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य योजने अंतर्गत इ. आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी पोषण पंधरवडा शासनाच्या धोरणानुसार राबविण्यात आला. यामध्ये वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा पाककला स्पर्धा, गटचर्चा, परसबाग, कडधान्यांचे महत्त्व असे विविध उपक्रम गुरुवारी (दि. १४) विद्यालयात घेण्यात आली.

या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले विविध पदार्थ परीक्षकांसमोर मांडले होते. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून विद्यालयाचे चेअरमन शरद खारकर, विद्यालयाचे मुख्याध्यापक डी. जी. हजारे, गुरुकुल प्रमुख जे. एस. ठाकूर यांनी काम पाहिले. इ. आठवीच्या वर्गशिक्षिका व्ही. व्ही. गावंड यांनी विद्यार्थ्यांकडून विविध पदार्थ बनवून घेऊन कार्यक्रमाचे नियोजन केले होते. विजेत्या विद्यार्थ्यांना पंधरवडा समाप्तीनंतर पारितोषिके वितरीत करण्यात येणार आहेत. यानंतर पोषण आहार याबाबत गटचर्चा आयोजित करण्यात आली. या गट चर्चेमध्ये विद्यार्थ्यांचे तीन गट तयार करण्यात आले, या तीन गटांमध्ये संतुलित आहार, त्यातून मिळणारे पोषक तत्त्वे, जीवनसत्त्वांची गरज, त्या अभावी होणारे विविध रोग यांची माहिती गुरुकुल प्रमुख जे. एस. ठाकूर यांनी दिली. मुख्याध्यापक डी. जी. हजारे हेदेखील गट सहभागी झाले. या गटचर्चेचे आयोजन विद्यालयाच्या इंग्रजी विषयाच्या शिक्षिका पी. आर. पवार यांनी केले होते. उपशिक्षिका पी. आर. पवार, ए. ई. कसपटे, एस. डी. पाटील उपस्थित होत्या.

याचबरोबर विद्यालयात हिंदी दिन साजरा करण्यात आला या वेळी हिंदीचे शिक्षक तथा मुख्याध्यापक डी. जी. हजारे यांनी हिंदी दिनाचे महत्त्व विषद केले. विद्यार्थ्यांनी या वेळी काही हिंदी कविता सादर केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गुरुकुल प्रमुख जे. एस. ठाकूर यांनी तर आभार व्ही. व्ही. गावंड यांनी मानले.





**भिवंडी : भूमिपुत्र माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी निगुर्ण कवळे यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी अभिनंदन केले. त्याचप्रमाणे उलवे अध्यक्षपदी महेंद्र पाटील, रायगड जिल्हाध्यक्षपदी मनेश पाटील आणि उरण तालुकाध्यक्षपदी सुदेश पाटील यांची नियुक्ती झाली आहे. त्याबद्दल त्यांनीही केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले.**

## पनवेलमध्ये पावसाच्या हजेरीने दिलासा

**पनवेल :** गेल्या काही दिवसांपासून दडी मारलेल्या पावसाने पुन्हा एकदा सुरुवात केल्याने पनवेलकरांना दिलासा मिळाला आहे. सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीपासूनच पावसाने दडी मारल्याने हवेत उष्णता वाढली होती, परंतु आता पाऊस बरसल्याने हवेत गारवा निर्माण झाला.


## CHANGE OF NAME

I the undersigned **Radh Harjeevan Thakur**(Old name) residing at **M.Dhutum, Post- Jasai, Tal- uran, Dist- Raigad** I Changed my name by the Affidavit No. **23520417212686001770 15 dated 14/09/2023** So that I remitter issue may here after be called by new name **Vidya vikas kadu**

Sign. by New Name
**Vidya vikas kadu**

वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा राम प्रहर

## Declaration

I Ravindra Laxman Kulkarni , Ex-POCD1 , No 163469-Y from Indian Navy hereby state that Date of Birth of my mother Mrs Urmila Laxman Kulkarni is not properly mentioned on my Service records and on her -dhaar card too. Only her Birth year 1936 is mentioned on -dhaar card. -s per best of her and our knowledge her Date of Birth is 19/01/1936.-ffidavit about the same has been made before Executive Magistrate, Uran on 13/09/2023.

**Date: 16/09/2023**

**Sd/-**
**Ravindra Laxman Kulkarni**


## सीकेटी विद्यालयात हिंदी दिवस कार्यक्रम



**पनवेल :** जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक विद्यालयाच्या मराठी माध्यमिक विभागांमध्ये गुरुवारी (दि. १४) दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक कैलास सत्रे व पर्यवेक्षक कैलास म्हात्रे यांचे मार्गदर्शन लाभले.

पद्मभूषण हरी प्रसाद द्विवेदी यांच्या प्रतिमेचे पूजन हिंदी शिक्षिका ज्योती पाटील यांनी केले. हिंदी विषय अध्यापकांच्या मार्गदर्शनाने साई मोळावडे, सृष्टी कोळी, समर्थ भेलेकर, प्रणाली बुवाजी, दिक्षा जाधव, सांची रांबाडे, जिया दिवकर, श्रावणी मनवे, सई दिवेकर, गार्गी म्हात्रे आदी विद्यार्थ्यांनी भाषण काव्यवाचन याचे सादरीकरण केले तसेच साहित्यकारांविषयीच्या माहितीचे संकलन केले. सूत्रसंचालन सारिका दिवेकर यांनी केले. आभार हिंदी शिक्षिका राधिका शिर्के यांनी मानले.

पान १ वरुन

## भाजपची दक्षिण रायगड जिल्हा कार्यकारिणी जाहीर

जिल्हा कोषाध्यक्षपदी हेमंत दांडेकर, तर जिल्हा कार्यकारिणी सदस्य म्हणून मारुती देवरे, बंडू खंडागळे, अनुराधा आपटे, डॉ. मंजुषा कुद्रीमोती, विनोद शहा, अक्षय ताडफळे, प्राजक्ता शुक्ला, शैलेश पटेल, जान्हवी अंजारा, संदीप ठोंबरे, डॉ. अजय जोगळेकर, सुधीर महाडिक, राजेंद्र धूमा, अमोल घोटणे, संजय भोईर, शोमेर पेणकर, नरेंद्र पाटील, नरेश खाडे, मिलिंद माने, सचिन करडे, सुरेंद्र माळी, ॲड. सुभाष पाटील, चंद्रकांत होजगे, योगेश झांजे, शोभा जोशी, भाग्यश्री आठवले, अप्पा देशमुख, निलम ठाकूर, तुकाराम पाटील, वंदना म्हात्रे, सुशीलकुमार शर्मा, दत्तात्रेय पाटील, प्रभाकर म्हात्रे, राजेश गोळे, स्वप्नील म्हात्रे, शांता भावे, राजेंद्र म्हामुणकर, अप्पा ढवळे, दर्शना म्हात्रे सरिता म्हात्रे, चिन्मय मोने, ॲड. दिव्या रातवडकर, हाजी कोठारी, संदेश पालकर, रवींद्र म्हात्रे आणि मोहन पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

याशिवाय महिला मोर्चा जिल्हाध्यक्षपदी हेमा मानकर, युवा मोर्चा निलेश थोरे, आदिवासी मोर्चा निमिष वाघमारे, ओबीसी मोर्चा समीर राणे, किसान मोर्चा परशुराम पाटील, अल्पसंख्याक मोर्चा रईस कादरी, आयुष्यमान भारत सेल संयोजकपदी दत्तात्रेय भुऱ्या पाटील, मच्छीमार सेल माणिक बळी, कामगार आघाडी रवींद्र पाटील, सोशल मीडिया श्वेता ताडफळे, आयटी सेल कौस्तुभ भिडे, दक्षिण भारतीय सेल पी.व्ही.सनिलकुमार, शिक्षक सेल हिरामण कोकाटे आणि सहकार सेल संयोजकपदी संजय पंदेरे यांची नियुक्ती झाली आहे.


### E-TENDER NOTICE

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender Specification:

| RFx No. | Description | Estimated Cost |
|---|---|---|
| Tend-29/23-24 **RFx No. 7000028351** | Replacement of 400kV, 220kV 100kV Lightning Arrestors required at various Substations under EHV (O&M) Circle, Panvel. | Rs. 37.03 Lakh |
| Tend-22/23-24 **RFx No. 7000028556** | AMC for Internal Inspection of T/F ICT & Attending Oil Leakage through HV & LV Bushing with Oil Filtration at various Substation under EHV (O&M) Circle, Panvel. | Rs. 100 Lakh |
| Tend-34/23-24 **RFx No. 7000028438** | Work of Installation and Commissioning of Tap Changer Controller cum Transformer Monitoring Units along with HMIT & Software at 100kV Dombivali Substation under EHV (O&M) Circle, Panvel. | Rs. 64.39 Lakh |

**EMD 1% of Estimated Cost, Submission of Bids:** From 14.09.2023 to 22.09.2023 up to 11:00 Hrs **Opening Date:** 22.09.2023 @ 11:30 Hrs **Tender Fee:** Rs. 500/- + GST each tender. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel. No. 022-27459624, Mob. No. 9769006131 e-mail ID: **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer**
**EHV (O&M) Circle, Panvel**

### E-TENDER NOTICE

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender Specification.

| RFx No. | Description | Estimated Cost |
|---|---|---|
| Tend-32/23-24 **7000028350 Re-Tender** | Providing 3 Nos. Highly Skilled Outsourced Persons at PID Unit Panvel under EHV (O&M) Circle, Panvel. | Rs. 13.25 Lakh |

**EMD:** 1% of Estimated Cost **Submission of Bids:** From 13.09.2023 at 18:00 Hrs to 20.09.2023 up to 23:59 Hrs **Opening Date:** 21.09.2023 @ 11:30 Hrs. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/** **Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006131 E-mail ID: **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer**
**EHV (O&M) Circle, Panvel**

### EXTENSION TO E-TENDER NOTICE

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification. **Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | **Tender No. & Name of Tender** | **RFx No. 7000028432** **Tender No.:** EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-38/2023-2024. Extenstion to Work of Repair, Restore & Renovation of Marshaling Kiosk Boxes, Isolator, AC/DC Supply, Breaker & CT-CVT Kiosk along with strenthening of MBs Foundation at 220kV Apta & Bombay Dyeing Substation under EHV (O&M) Division, Panvel. **Tender Amount Limited to:** Rs. 25,00,000/- **EMD Amount:** Rs. 25,000/- |
| 2 | **Online Downloading of the RFx** | 15.09.2023, 17:00 Hrs to 21.09.2023, 23:59 Hrs. |
| 3 | **Online Submission of the RFx** | On or Before 21.09.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | **Online Opening of the Techno-Commercial RFx** | 22.09.2023 at 11:00 Hrs (if Possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): 022-2746 5410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस आमचे अशिलांतर्फे जाहीर हरकत नोटीस देण्यात येते. की, मौजे – नानोशी ता. पनवेल जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी कायम खरेदी करण्याबाबत आवश्यक ते करारनामे केले असुन संबधित जमिन मालकांना ठरल्या प्रमाणे मोबदला दिलेला आहे. सदर जमिन विक्री परवानगीसाठी प्रकरण शासनाकडे सादर केले आहे. असे असताना काही तथाकथीत दलाल मुळ जमिन मालकांचा गैर समज करुन व त्यांना जादा मोबदल्याचा अमिष दाखवुन सदर जमिन मिळकतीचा व्यवहार काही त्रयस्थ खरेदीदारांबरोबर करीत असल्याचे आमचे अशिलांना समजले आहे. सदर जमिन मिळकतीचा असा कोणताही खरेदी विक्रीचा व्यवहार कोणीही केल्यास त्यास आमचे अशिलांची तिव्र हरकत राहील. तसेच असा केलेला कोणताही व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच आमचे अशिलांचे कोणतेही कायदेशीर हक्क व अधिकारास बाधा येणार नाही. सदर जमिन खरेदीचा आमचे अशिलांचा कायदेशीर अधिकार काहीही झाले तरी अबाधित राहील याची सर्वांनी समज घ्यावी. याउपर कोणी व्यवहार केल्यास त्यामुळे होणाऱ्या सर्व नुकसानीस असा तथाकथीत खरेदीदार व दलाल जबाबदार राहुन आमचे अशिलांचे होणारे आर्थीक नुकसान भरुन देण्यास बांधील राहतील. तसेच व्यवहारा बाबत योग्य तो दिवाणी व फौजदारी खटला दाखल करण्याचे तयारीत आमचे अशील आहेत याची ही समज सर्वांनी घ्यावी. तरी असा कोणताही प्रयत्न कोणी करु नये व करीत असल्यास तो ताबडतोब थांबवावा असे आमचे अशिलांतर्फे जाहीर करीत आहोत.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे – नानोशी ता. पनवेल जि. रायगड**

| अ.न. | गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | जमिन धारकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | १८ | ० | ३-५८-० | चांगीबाई महादू भला |
| २. | २० | ० | ९-८१-० | पदमाकर महादू पारधी |
| ३. | ३५ | ० | ७-८५-० | मंगळी मधुकर चौधरी |
| ४. | ३६ | ० | ८-२५-० | भरत मंगळ्या पारधी |
| | | | | मानकुबाई धनाजी पारधी उर्फ निरगुडा |
| | | | | आंबीबाई मंगळ्या पारधी |
| | | | | शोभा चंद्रकांत दरवडा |
| | | | | जयश्री साईनाथ भला |
| | | | | गोमा कमळ्या पारधी उर्फ दरवडा |
| | | | | प्रकाश काळुराम पारधी उर्फ निरगुडा |
| | | | | आंबो कमळ्या पारधी उर्फ निरगुडा |
| | | | | वसंत आंबो उर्फ आंब्या पारधी |
| | | | | जनाबाई बुधाजी ठाकरे |
| | | | | मंगीबाई आंबाजी पारधी उर्फ निरगुडा |
| | | | | सुरेश आंबाजी पारधी उर्फ निरगुडा |
| | | | | जनी कमळु वाघ |
| | | | | चांगुणी काळुराम कामठी |
| | | | | राधीका रामा चौधरी |
| | | | | अशोक माया पारधी |
| | | | | गजानन शंकर पारधी |
| | | | | प्रमोद माया पारधी |
| | | | | सुकेश शंकर पारधी |
| | | | | कान्ही बाळू ठाकरी उर्फ ठाकरे |
| | | | | जयमाला वान ढुमणे |
| | | | | संगीता बामा सप्रा |

**ठिकाण – पनवेल**
**दिनांक १२/०९/२०२३**

**सही/–**
**ॲड. अरुण कुमार**

### स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव

तमाम लोकांना जाहीर करण्यात येते की, कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल या संस्थेचे खालील नामनिर्देशित केलेले सभासद थकबाकीदार आहेत. त्यांचेकडील थकबाकीची रक्कम वसुल करणेसाठी त्यांच्या खालील स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव त्याचे नावासमोर दर्शवलेल्या वेळी, रोजी, ठिकाणी होणार आहे. तरी, ज्यांना सदर मिळकतीच्या लिलावात बोली बोलून घ्यावयाची असेल त्यांनी संस्थेशी संपर्क साधून मिळकतीची प्रत व ठिकाण पाहून घ्यावे व लिलावाच्या दिवशी व वेळी उपस्थित रहावे.

| अ. नं. | थकबाकीदाराचे नाव व पत्ता | मिळकत नं व गट नं. ठिकाण | क्षेत्र हे. आर. | लिलाव करावयाचा हिस्सा | आकार रू. पै. | लिलावाची तारीख, वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| | श्रीमती ज्योती किरण कल्याणकर व श्री. किरण दत्तात्रय कल्याणकर रा. किनारा को. ऑप. हौ. सोसायटी लि. प्लॉट नं. बी १/४, बावन बंगला, पनवेल. | मौजे पनवेल महानगर पालिका हद्दीतील फायनल प्लॉट नं. ५२१ / २ वर बांधलेली किनारा को. ऑप. हौसिंग सोसायटी मधील फ्लॅट नं. सी./३/२. तळमजला ज्याचे क्षेत्र ५९३.३२ चौ. फुट. बिल्टअप | ५९३.३२ चौ. फुट बिल्टअप | ५९३.३२ चौ. फुट बिल्टअप | — | शनिवार दि: ३०/०९/२०२३ वेळ: सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० वाजता. मारुती अपार्टमेंट कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल रो हाऊस, प्लॉट १, ६२६, पनवेल ४१०२०६. |

टिप– १) लिलावाचे अटी व शर्तीचे वाचन लिलावाचे वेळी करण्यात येईल.
२) लिलावापूर्वी कर्ज खाते बंद झाल्यास लिलाव रद्द केला जाईल.
३) येणे रक्कमेचा विचार करून मालमत्तेची विक्री केली जाईल.
४) कोणतेही कारण न दाखवता लिलाव मंजूर अगर नामंजूर करणे व पुढे ढकलणे याबाबतचे अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.
५) अपसेट व्हॅल्यू रू. ४४,३३,३३६/– (अक्षरी रूपये चव्वेचाळीस लाख तेहतीस हजार तीनशे छत्तीस मात्र) याचे वरती बोली करावी लागेल.

**ठिकाण: पनवेल**
**दिनांक १४/०९/२०२३**

**सही/–**
**सुनिल सदानंद गद्रे**
**वसुली अधिकारी**
**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**

### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**मुदतवाढ सूचना क्र. २**

**ई निविदा सूचना क्र. ५५/२०२३-२०२४ (मुंबई) करीता**

दिनांक ३०/०८/२०२३ रोजी दैनिक दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण / महामंडळाचा खुलास व ई निविदा महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्धेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव |
|---|---|
| १. | देवरूख लघू औद्योगिक क्षेत्र.. देवरूख लघू औद्योगिक क्षेत्रामधील अंतर्गत रस्त्यांच्या कडेने उभारलेल्या ७ मीटर अष्टकोनी खांबावर १ वर्षाच्या दोष दायित्व कालावधीनंतर ५ वर्षांच्या सर्वसमावेशक देखभालीसह विद्यमान पथदिवे ६० वॅट एलईडीने बदलणे. |

उपरोक्त कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक २२/०९/२०२३ पर्यंत महामंडळाच्या https://www.midcindia.org या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

ज्या निविदा धारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतक कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

# डेंग्यू, मलेरिया रोखण्यासाठी उपाययोजना

## पनवेल महापालिकेत आरोग्य, घनकचरा व स्वच्छता विभागाची बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात डेंग्यू आणि मलेरियाच्या डासाचे प्रमाण वाढू नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी (दि. १४) मुख्यालयात उपायुक्त सचिन पवार यांच्या अध्यक्षतेखाली वैद्यकिय आरोग्य विभाग आणि घनकचरा व स्वच्छता विभागाची बैठक घेण्यात आली.

या वेळी मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. राजाराम मोरे, घनकचरा व स्वच्छता विभाग प्रमुख अनिल कोकरे, साथरोग अधिकारी डॉ. अक्षय ठासळे, चार प्रभागाचे प्रभाग अधिकारी, वैद्यकिय अधिकारी, स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते.

या वेळी उपायुक्त सचिन पवार यांनी डेंग्यू व मलेरिया होण्याची कारणे नागरिकांपर्यंत पोहचण्यासाठी जनजागृती मोठ्या प्रमाणात करणे महत्वाचे सांगून, जनजागृतीचे बॅनर्स, पोस्टर्स सर्व सोसायटच्यापर्यंत पोहचविण्याच्या



सूचना दिल्या.तसेच खाजगी दवाखान्यांनी त्यांच्याकडे मलेरिया डेंग्यूचे रुग्ण आल्यास महापालिका, जवळच्या प्रभागकार्यालयास किंवा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रास कळविण्याबाबत सूचना दिल्या. जेणेकरून महापालिकेस कोणत्या भागात आजार वाढतो हे कळेल व त्याठिकाणी उपाययोजना वाढविता येतील. तसेच डॉ. आनंद गोसावी यांनी कर्मचाऱ्यांनी डेंग्यू व मलेरिया होऊ नये यासाठीची माहिती सर्व सामान्य नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी स्वत: पासून सुरूवात करावी. आपल्या जवळच्या, आसपासच्या सर्वांना आजाराची माहिती दिल्यास साथ वाढणार नाही. याचबरोबर स्वच्छता निरीक्षकांनी बांधकामांच्या ठिकाणी, सोसायट्यांमध्ये औषध फवारणी, धूर फवारणीचे प्रमाण वाढविण्याच्या सूचना दिल्या. तसेच स्वच्छता निरीक्षकांनी आपल्या आपल्या भागाचे सर्वेक्षण करून त्याचा अहवाल वैद्यकिय आरोग्य विभागास देण्याच्या सूचना दिल्या तसेच डेंगी व मलेरियाचे डासाची उत्पत्ती स्थाने जसे घरातील कुंड्याखालील बश्या, फ्रिजचे डिफ्रास्ट ट्रे, कुलर, छतावर टाकलेले प्लास्टिक यामधील पाणी नियमित काढावे. घरातील फुलदाण्या, शोभिवत झाडांमधील पाणी नियमित बदलावे. ही माहिती जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहचवावी अशा सूचना दिल्या.

**पावसाळी कालावधीत विविध प्रकारचे किटकजन्य तसेच साथजन्य आजार उद्‌भवत असतात. वैद्यकिय आरोग्य विभागामार्फत घ्यावयाच्या खबरदारी विषयी जनजागृती विविध माध्यमांतून करण्यात येत आहे. महापालिकेने दिलेल्या सूचनांचे पालन करून नागरिकांनी पुरेशी दक्षता बाळगल्यास आजारांवर वेळीच प्रतिबंध घालणे शक्य आहे.**

**–गणेश देशमुख, आयुक्त, पनवेल महानगरपालिका**

# आमदार महेश बालदी यांच्या हस्ते उरणमध्ये आयुष्मान मोहिमेचा शुभारंभ

**उरण : बातमीदार**

आयुष्मान भव मोहिमेचा शुभारंभ राष्ट्रपती महोदया द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते बुधवारी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे राष्ट्रीय पातळीवर झाला. या धर्तीवर राज्य शासनानेदेखील आपला कार्यक्रम होताच तालुकास्तरावरील कार्यक्रमाचा शुभारंभ ग्रामीण रुग्णालय उरण येथे आमदार महेश बालदी, विधानसभा सदस्य यांच्या व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत मोठ्या दिमाखात झाला.

या कार्यक्रमास भाजप तालुकाध्यक्ष रवी भोईर, शहराध्यक्ष कौशिक शाह, राजू ठाकूर, तालुका आरोग्य अधिकारी उरण डॉ. राजेंद्र इटकरे, इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बाबासो काळेल, ग्रामीण रुग्णालय उरण तसेच इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय येथील कार्यरत असणारे सर्व वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, अंगणवाडी कार्यकर्त्या व आशा कार्यकर्त्या व नागरिक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन आमदार महेश बालदी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमावेळी महेश बालदी यांचे स्वागत वैद्यकीय अधीक्षक डॉ. बाबासो काळेल यांनी केले. तसेच मंचावरील सर्व प्रतिष्ठित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.



एक अभिनव उपक्रम असा टीबी चॅम्पियन अशा दोन रुग्णांचा ज्यांनी क्षय रोगावर पूर्ण औषधोपचार घेऊन क्षयरोग वर मात केली अशा रुग्णांचा सत्कार करण्यात आला. आजारावर मात केलेल्या विविध रुग्णांचा सत्कार समारोह या ठिकाणी आमदार महेश बालदी यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच दोन असेही क्षय रुग्ण ज्यांना प्रोटीन युक्त धन्य वाटप करण्यात आले.

आयुष्यमान भव मोहिमेच्या शुभारंभावेळी निश्चय मित्र म्हणून आयओटी (इंडियन ऑइल आदानी वेंचुरीयस लिमिटेड) या कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांचेही कौतुक व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. आमदार महेश बालदी यांनी अध्यक्षीय भाषण करत असताना या कार्यक्रमाचे खूप कौतुक केले, असे कार्यक्रम व्हायला पाहिजेत आणि गोरगरिबांपर्यंत या शासनाच्या सर्व योजना गेल्या पाहिजेत या योजनेच्या माध्यमातून नागरिकांना गंभीर आजारी पडल्यास त्यांच्या पुढील उपचारासाठी आयुष्यमान हेल्थ कार्डमधून जे शासन मान्य हॉस्पिटल निश्चित केले गेले आहेत त्या ठिकाणी पाच लाखापर्यंत विनामूल्य औषधोपचार मिळणार आहे, असे मत महेश बालदी यांनी व्यक्त केले. ज्या ज्या वेळेस तुम्हाला कोणत्याही इन्फ्रास्ट्रक्चरची किंवा अन्य कोणत्याही साधनसामुग्रीची गरज असेल तर तुम्ही माझ्याशी किंवा माझ्या कोणत्याही कार्यकर्त्या सोबत संवाद जरी साधला तरी ते काम पूर्ण होईल अशी ग्वाही देऊन पुढील तीन महिन्यांमध्ये या योजनेमधून जास्तीत जास्त नागरिकांचे आयुष्मान हेल्थ कार्ड कसे काढले जाईल याकडे लक्ष केंद्रित करावे असे आवाहनही आमदार बालदी यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजेंद्र ईटकरे तर आभार व सूत्रसंचालन उरण टी. एच.ओ हेल्थ असिस्टंट संतोष परदेशी यांनी केले.

# करंजाडेमध्ये रस्त्याच्या कॉंक्रीटीकरणाचे भूमिपूजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

करंजाडे ग्रामपंचायत हद्दीतील गावदेवी आदिवासीवाडीतील रस्त्याच्या कॉंक्रीटीकरणाचे काम सुरू झाले असून, या कामाचे भूमिपूजन सरपंच मंगेश शेलार आणि भाजपचे विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार यांच्या हस्ते झाले.

करंजाडे ग्रामपंचायत हद्दीत भारतीय जनता पक्ष आणि सरपंच मंगेश शेलार यांच्या माध्यमातून अनेक विकासाच कामे मार्गी लागून नागरिकांना विविध सुविधा उपलब्ध होत आहेत. त्यानुसार करंजाडे ग्रामपंचायतीच्या निधीमधून गावदेवी आदीवासीवाडीमध्ये रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करण्यात येणार आहे. याकामाचे भूमिपूजन सरपंच मंगेश शेलार आणि भाजपचे विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार यांच्या हस्ते झाले.

या वेळी भाजपचे करंजाडे शहर अध्यक्ष मिरेंद्र शहारे, ग्रामपंचातीचे उपसरपंच सागर आंग्रे, सदस्य सुनील भोईर, नंदकुमार भोईर, आतीष साबळे, सुरज शेलार, देवकुबाई वाघे, माजी सरपंच ठकुबाई वाघ, सागर कदम, गणेश प्रबलकर, बळीराम भोईर, कृष्णा वाघे, भीम वाघे यांच्यासह पदाधिकारी, ग्रामस्थ आणि मान्यवर उपस्थित होते. रस्त्याचे काम मार्गी लावल्याबद्दल गावदेवी आदिवासीवाडीतील ग्रामस्थांनी आभार मानले आहेत.

# भाजप कळंबोलीतर्फे माझी माती माझा देश कार्यक्रम उत्साहात



**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ९ ऑगस्ट रोजी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या सांगतेनिमित्त माझी माती माझा देश हा संकल्प घेतला, त्यानुसार केंद्र सरकारकडून हा संकल्प राबवण्यात येत आहे. या संकल्पनेतून धरती मातेला नमन तसेच देशाच्या सैनिकांना वंदन केले जात आहे. भाजप कळंबोली मंडलकडून माझी माती माझा देश संकल्प राबवण्यात आला. या वेळी पंच प्रण थपथ व माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला.

माजी सैनिक मोहन सिंग बिष्ट, बसंत वल्लभ जोशी, जगदीश चंद्र भट्ट, शिवप्रसाद थापलीयल, हंसदत्त कंडपाल व किशन कदम या माजी सैनिकांचा सत्कार कळंबोली मंडळतर्फे करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या वेळी कळंबोली मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष कदम, माजी नगरसेवक अमर पाटील, राजेंद्र शर्मा, सरचिटणीस दिलीप बिष्ट, उपाध्यक्ष संदीप भगत, संदीप म्हात्रे, प्रभाग अध्यक्ष प्रकाश शेलार, उत्तर भारतीय अध्यक्ष केशव यादव, महिला मोर्चा अध्यक्षा मनीषा निकम, उपाध्यक्ष प्रियांका पवार, सरचिटणीस दुर्गा शहाणी, अध्यक्ष अ.भ.वी आभा गुटुकडे, बजरंबली, निशांत गिल, मच्छिन्द्र कुरुंद, तुषार जगदाळे, विष्णू गायकवाड व माजी सैनिक आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



**उरण : राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी जेएनपीए प्रशासनाला भेट दिली. आमदार महेश बालदी यांनी त्यांचे स्वागत केले. या वेळी भाजप तालुकाध्यक्ष रवी भोईर, शहराध्यक्ष कौशिक शाह, उपनगराध्यक्ष जयविंद्र कोळी, करंजा सोसायटीचे चेअरमन प्रदीप नाखवा, माजी नगरसेवक राजू ठाकूर, करंजा सोसायटीचे सदस्य राजेश नाखवा, कामगार नेते सुरेश पाटील आदी उपस्थित होते.**

# वर्षा ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली सीकेटी विद्यालयात हिंदी दिवस



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय हिंदी दिवस जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयात साजरा झाला. या वेळी माजी विद्यार्थिनी हर्षिका पाठक आणि निवृत्त शिक्षिका तसेच भारत विकास परिषद सदस्या आभा जांबेकर या विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान ज.भ.शि.प्र. संस्थेच्या संचालिका वर्षा ठाकूर यांनी भूषविले.

प्रस्तावना सहाय्यक शिक्षिका सुप्रिया ताम्हनकर यांनी केली. विद्यार्थ्यांनी हिंदी नाटिका, नृत्य असे अप्रतिम कार्यक्रम शशिकला पाटील आणि प्रमोद शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केले. तसेच शालेय गायकवृंदाने देशभक्तीपर गीत सादर केले. या निमित्त झालेल्या हिंदी कविता गायन तसेच हिंदी भाषण स्पर्धेतील विजेत्यांनी उत्कृष्ट सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. सहशिक्षक प्रमोद शेळके यांनी शिक्षक मनोगत व्यक्त केले.

या वेळी माजी विद्यार्थीनी हर्षिका पाठक हिने शिक्षक व पालक यांच्या आज्ञेचे सदैव पालन करा, असे सांगितले. प्रमुख पाहुण्या आभा जांबेकर यांनी आपल्या भाषेवर प्रभुत्व मिळवा आणि राष्ट्रभाषेचा अभिमान बाळगा, असे सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष वर्षा ठाकूर यांनी सांगितले की, राष्ट्रभाषा आपली ओळख आहे आणि म्हणूनच हिंदीविषयी प्रेम आणि सन्मान व्यक्त करणे हे आपले कर्तव्य आहे. कार्यक्रमातील सहभागी विद्यार्थीचे त्यांनी कौतुक केले आणि मनाच्या निर्मलतेला जीवनभर कायम ठेवा असेही विद्यार्थ्यांना सांगितले.

शाळेच्या प्रगतीसाठी तत्पर असलेल्या मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांची यांनी प्रशंसा केली. मुख्याध्यापक श्री संतोष चव्हाण यांनी मार्गदर्शपर भाषणात हिंदी विभाग प्रमुख सौ. शशिकला पाटील आणि हिंदी विभागातील सर्व शिक्षकांचे अतिशय सुनियोजित आणि अप्रतिम कार्यक्रम सादर केल्याबद्दल विशेष कौतुक केले. तसेच विद्यालयाच्या वेळोवेळी लाभत असलेल्या मार्गदर्शनाबद्दल वर्षा ठाकूर यांच्याविषयी गौरवोद्‌गार काढले.

प्रगती जाधव आणि आस्था त्रिपाठी व वैष्णव आहेर या विद्यार्थ्यांनी उत्कष्ट सूत्रसंचलन केले. कार्यक्रम शिस्तीत पार पाडण्यात अशोक पाटील यांनी महत्वाची भूमिका बजावली. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# खारघरमध्ये एकाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

खारघर गुरुद्वारच्या समोरील बसस्टॉप समोरील फुटपाथवर, सेक्टर २० येथे अनोळखी इसम बेशुद्ध अवस्थेत आढळला. त्याला पनवेल उपजिल्हा रुग्णालय येथे दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

त्याचे वय अंदाजे ४५ ते ५० वर्ष, रंग गोरा आहे. त्याने अंगात फिकट गुलाबी रंगाचा टी–शर्ट आणि काळा रंगाचे हाफ पॅन्ट घातली आहे. त्याच्या उजव्या हाताच्या मनगटावर बदामात 'ठ' असे गोंदवलेले आहे. या व्यक्तीबाबत अधिक माहिती असल्यास पोलिस उपनिरीक्षक अमोल खाडे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# पनवेलमध्ये शालेय विद्यार्थ्यांनी घेतला मतदानाचा अनुभव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकांच्या शाळांमध्ये विविध उपक्रम राबविले जातात. मतदान निवडणुक यंत्रणा विद्यार्थ्यांना समजावी यासाठी गुरुवारी (दि. १४) पनवेल महापालिका शाळा क्रमांक १ लोकनेते दि. बा. पाटील विद्यालयामध्ये इयत्ता पाचवी ते सातवीचे विद्यार्थ्यांचे मतदान घेण्यात आले.

या वेळी शालेय विद्यार्थी उमेदवार बनले. त्यांनी तीन दिवस वर्गातून प्रचार केला, इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी मतदान अधिकारी म्हणून काम पाहिले अश्या प्रकारे शालेय निवडणूक घेण्यात आली. निवडणूक आलेले विद्यार्थ्यांना पद देऊन शालेय मंत्रिमंडळ स्थापन करण्यात आले. शिक्षण विभाग प्रमुख किर्ती महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. या वेळी सर्व शिक्षक व मुख्याध्यापक उपस्थित होते.



# खारघरच्या रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये लिंग संवेदनशीलता विषयावर विशेष सत्र



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात गुरुवारी (दि. १४) व्यवस्थापन संघटना, अंतर्गत तक्रार समिती व पुणे व्यवस्थापन संघटना संयुक्त विद्यमाने 'लिंग संवेदनशीलता' या विषयावर विशेष सत्राचे आयोजन केले होते.

या सत्रासाठी प्रमुख वक्ते म्हणून दिपाली सदावर्ते यांनी उपस्थित राहून आजच्या एकविसाव्या शतकात, आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातही महिलांना असमानतेची मिळणारी वागणूक हा चिंतेचा आणि चिंतनाचा विषय असून, समाजात महिला–पुरुष समानतेच्या दृष्टीने लिंग संवेदनशीलता रुजणे अत्यंत गरजेचे असल्याचे प्रतिपादन महाविद्यालयातील सर्व शाखेतील विद्यर्थ्यांना प्रतिपादन केले.

त्या पुढे म्हणाल्या की, आजही महिलांना असमानतेमुळे अनेक समस्यांना समोर जावे लागते तसेच मुलींना लहानपणापासूनच घरात असमानतेची वागणूक मिळते तू मुलगी आहे, तू अशी वागू नको, अशाप्रकारे घरातूनच असमानतेची सुरुवात होते. मग समाजातही हीच स्थिती दिसते. लिंग संवेदनशीलतेच्याबाबतीत जागरूकता निर्माण करण्याची आवश्यकता असून, घरात पालकांनी, तर शाळा, महाविद्यालयात शिक्षकांनी ही असमानता दूर करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. महेश्वरी झिरपे यांची प्रमुख उपस्थिती होती. महाविद्यालयातील सर्व शाखेतील सुमारे १०० विद्यार्थी व विद्यार्थिनी या सत्राचा लाभ घेतला. या सत्राचे आयोजन व्यवस्थापन शिक्षणचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. रीत ठुले व अंतर्गत तक्रार समितीचे समन्वयक प्रा. अंकिता जांगिड यांनी केले तसेच प्रा. डॉ. धनवी आवटे, प्रा. दिव्या निंबोत्री, प्रा. रेवण शिंदे प्रा. विशाल देशमुख, प्रा. सायमा नाटेकर, प्रा. कावेरी घोगरे, प्रा. डॉ. नीलम लोहकरे, प्रा. डॉ. कविता शिंदे, प्रा. प्रवर शर्मा व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.



**पनवेल : दै. रामप्रहरचे प्रतिनिधी संजय कदम यांना मुख्य संपादक देवदास मटाले तसेच मल्हार चॅनेलचे संपादक नितीन कोळी यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी 'मल्हार'चा कर्मचारीवृंद मनिषा हातमोडे, रुषाली ठाकूर, पंकज डावलेकर, श्रीगणेश धुमाळ उपस्थित होते.**

## संपादकीय

# फलश्रुती काय?

आंतरवली सराटी या गावामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे अखेर पोहोचले आणि त्यानंतरच मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आपले उपोषण आटोपते घेतले. मराठा समाजाला आरक्षण देण्याचे काम तात्पुरत्या मलमपट्टीने साधणारे नाही. ते न्यायालयात टिकणारे हवे. सुदैवाने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासारखा कायद्याचा जाणकार सहकारी मुख्यमंत्री शिंदे यांना लाभला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासारखे दमदार नेतृत्व त्यांच्या पाठिशी उभे आहे. त्यामुळेच मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटलाच तर तो या तिघांच्या सत्ताकाळातच सुटेल याची खात्री साऱ्यांनाच वाटते.

**आंतरवली सराटी या गावामध्ये आमरण उपोषणाला बसलेले मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी सतराव्या दिवशी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते फळांचा रस घेऊन आपले उपोषण संपवले. अर्थात, मराठा आरक्षणाच्या प्रश्नी समाधानकारक तोडगा काढण्यासाठी राज्य सरकारला त्यांनी एक महिना आणि दहा दिवसांचा अवधी दिला आहे. या काळात तोडगा न निघाल्यास पुन्हा आमरण उपोषणाचे हत्यार उपसण्याचा इरादा त्यांनी स्पष्ट केला आहे. मराठा आरक्षणाचा प्रश्न इतक्या सहजासहजी सुटणारा नाही हे साऱ्यांनाच माहीत आहे. गेल्या काही वर्षांमध्ये अनेक सरकारे आली आणि गेली. सत्ताकारणामध्ये भक्कम स्थान असलेल्या मराठा समाजाला या चार दशकांमध्ये न्याय देणारे एकही सरकार येऊ शकले नाही हा काही योगायोग नव्हे. हा प्रश्नच इतका गुंतागुंतीचा आहे की त्यावर तोडगा काढणे कठीणप्राय कामगिरी आहे. अनेक वर्षे सत्ता भोगूनही काँग्रेसला मराठा आरक्षणाचा प्रश्न एक इंचही पुढे सरकवता आला नाही. याबाबत खऱ्या अर्थाने सकारात्मक पावले टाकली ती भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते व माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वानेच. त्यांचे सरकार असताना न्यायालयीन लढाईत निम्मी बाजी मारण्यापर्यंत मजल मारली गेली होती. दुर्दैवाने विश्वासघातामुळे त्यांचे सरकार पुन्हा येऊ शकले नाही. त्यानंतरची महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळातील अडीच वर्षे अक्षरश: वाया गेली. परिणामी, मराठा आरक्षणाचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात टिकू शकला नाही. गुरुवारी आंतरवली सराटी या गावामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे अखेर पोहचले आणि त्यानंतरच मनोज जरांगे-पाटील यांनी उपोषण आटोपते घेतले. या आंदोलनाची सुरुवातच महाराष्ट्रातील वातावरण ढवळून काढणारी ठरली. जालन्यामध्ये प्रक्षुब्ध जमावावर पोलिसांनी लाठीमार केल्यामुळे वातावरण तापत गेले. हिंसक आंदोलनांसाठी मराठा समाज प्रसिद्ध नाही. गतकाळात याच समाजातर्फे लाखोंच्या संख्येने तब्बल ५८ मूक-मोर्चे निघाले हे विसरता येणार नाही. याच मूक-मोर्चांना उद्धव ठाकरे गटाच्या प्रवक्त्यांनी किती हिणवले होते हेही लोकांना आठवत असेल. गेला पंधरवडाभर मराठा आरक्षणाचा प्रश्न सर्वत्र गाजतो आहे. खरे तर सर्वच पक्षांनी एकत्र येऊन या प्रश्नी लक्ष घातले असते तर तोडगा निघायला इतका काळ जावा लागला नसता. मनोज जरांगे-पाटील यांनी उपोषण सोडावे म्हणून किमान अर्धा डझन मंत्र्यांनी आंतरवली सराटीच्या अनेकदा फेऱ्या मारल्या. सत्तेचा अहंकार बाजूला ठेवून प्रसंगी नमते घेत राज्यकर्त्यांनी आंदोलकांची बाजू शांतपणे समजून घेतली. याचे प्रमुख कारण म्हणजे, सध्याचे सरकार मराठा आरक्षणाच्या विरोधात काम करणारे अजिबातच नाही. आंदोलनकर्त्यांच्या बाबत मोठी सहानुभूती बाळगणारे हे सरकार आहे. उभयपक्षीचे हे सौहार्द असेच टिकून राहील आणि महाराष्ट्रातील वातावरण पुन्हा एकदा शांत होईल, अशी गणपतीबाप्पाच्या चरणी प्रार्थना...**

# पेणमधील गणपती कारखानदारांच्या समस्या

खबरबात
प्रकाश सोनवडेकर



गणपती बाप्पाच्या आगमनाला अवघे सहा दिवस उरले आहेत. गणेश मूर्ती कारखान्यांमध्ये सध्या लगबग सुरू आहे. गणेशमुर्तींचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पेणमध्ये सध्या अहोरात्र काम सुरू आहे. पेण तालुक्यात गणपती बनविणारे ५०० कारखाने आहेत. यातून दरवर्षी साधारणपणे २५ लाख गणेशमुर्ती बनवल्या जातात. गणेशमुर्ती बनविण्याच्या या व्यावसायातून दरवर्षी करोडो रूपयांची उलाढाल पेण शहर व आसपाच्या गावांमधून करोडो रूपयांची उलाढाल होत असते. अनेक समस्यांना तोंड देत हा व्यवसाय चालवला जातो. या गणपती कारखानदारांच्या समस्या आहेत. त्या सोडवल्या पाहिजेत.

पेण तालुक्याला गणेशमूर्ती निर्मितीचे माहेरघर समजले जाते. वर्षभर कारखान्यांमधून आता गणेशमूर्ती तयार केल्या जातात. या परिसारातून परदेशातदेखील गणेशमुर्ती पाठविल्या जातात, परंतु या कारखानदारांना समस्यांनादेखील तोंड द्यावे लागते. यंदा जुलै महिन्यात झालेल्या आतिवृष्टीमुळे हमरापुर, जोहे, कळवे, सोनखार, तांबडशेत, उर्नोली, दादर, रावे मेथील गणेशमूर्ती कारखान्मांमध्मे पावसाचे पाणी शिरल्याने गणपती कारखानदारांचे लाखो रुपमांचे नुकसान झाले.

शाडुच्या मूर्तींच्मा किमंतीमध्ये झालेली वाढ तसेच हाताळण्यास नाजूक असल्माने मोठमोठ्या गणेशोत्सव मंडळांकडून मात्र अजून प्लॅस्टर आफ पॅरिसच्मा मुर्तींनाच मागणी असते. गणेशभक्तांनी सहा महिने अगोदर मुर्ती बुकींग केलेल्या असतात. मूर्ती घडवून तयार होत्या. परंतु अतिवृष्टीमुध्ये त्या मूर्ती भिजल्या. त्या वेळेत तयार करण्यासाठी मोठी कसरत करावी लागली. दोन महिन्यांसाठी जादा मनुष्यबळाच्या मदतीने जादा मोबदला देऊन हे काम करावे लागले आहे.

पेण शहराला गणेशमूर्ती बनविण्याचा मोठा वारसा लाभलेला आहे. आकर्षक रंगसंगती आणि देखणी मुर्ती हे पेणमधील गणेशमुर्तीचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे पेणच्या गणपतींच्या मुर्तींना केवळ महाराष्टातच नव्हेतर देशभर आणि परदेशातूनही माणी वढत आहे. पेण शहराला गणेशमूर्ती व्यवसायाच्या बाजारपेठेचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

पूर्वी पेण शहरातच गणेशमुर्ती बनविण्याचे कारखने होते. आसपासच्या परिसरातील कामगार या कारखान्यांमध्ये काम करण्यासाठी यायचे. मागील काही वर्षापासून पेण शहाराच्या जवळ असलेल्या गावांमध्ये गणपतींचे कारखाने सुरू झाले आहेत. या गावांमधूनही मोठ्या प्रमाणांवर गणेशमुर्ती बनविल्या जाता. पेण शहारात असलेल्या कारखान्यांमधून काम करणारे कामगार गणेशमुर्ती बनविण्याची कला शिकले व त्यांनी स्वातःचे कारखाने सुरू केले. तसेच आसपाच्या गावांमधून येणारे कामगार जवळच्याच गावात किंवा स्वतःच्याच गावात काम मिळत असल्यामुळे ते पेणमध्ये काम करण्यासाठी येत नाहीत. परिणामी पेण शहरातील गणपती कारखान्यांमध्ये कामकरण्यासाठी येणार्या कुशल कामगारांची संख्या कमी झाली आहे. पुरेसे कुशल कारमगार नसल्यामुळे पेणमधील गणपती कारखान्यांच्या मालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. पेण शहरातील सर्वच गणपती कारखान्यांना ही समस्या भेडसावत आहे.

मागील काही वर्षांपासून प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मुर्तीवर बंदी घालण्याची मागणी होते. शाडूच्या मुर्ती बनविण्याचा मागणी केली जाते, परंतु शासन याबात काही ठोस निर्णय घेत नाही. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मुर्ती बनविल्या आणि शासनाने त्यावर बंदी घतली तर नुकसान होईल. याभितने पीओपीच्या मुर्ती बनवायच्या की नाही या व्दिधा मनःस्थित कारखानदार असतात. शाडूच्या मुर्ती हाताळताना फार काळजी घ्यावी लागते म्हणून गणेशभक्त पीओपीच्या मुर्तींची मागणी कराता. ही समस्या सोडविण्यासाठी शासनाने पीओपी मुर्तींबाबत ठोस निर्णय घेतला पाहिजे.

पेण शहर व असपासच्या परिसरात गणेशमुर्ती तयार करणारे शेकडो कारखाने आहेत. हा व्यवसाय विस्कळीत स्वरूपात आहे. या व्यवसायाचे विस्कळीत स्वरूप घालवून त्याला संघटीत स्परूप द्यावे. त्यांना चागल्या सुविधा मिळाव्यात. त्याचे जगभारात ब्रँडींग व्हावे यासाठी केंद्र सरकारने पेणच्या गणपती कारागिरांसाठी क्लस्टर डेव्हलपमेंट योजना सुरू करण्यास मान्यात दिली होती. मूर्तीकार संघटनांना स्वतःची प्रयव्हेट लिमिटेड कंपनी स्थापन करण्यास सांगण्यात आले. यात कारखानदारांना १० टक्के वाटा उचलायचा होता उर्वरीत ९० टक्के खर्च केंद्र सरकार करणार होते. १० टक्के वाटादेखील बँक ऑफ इंडीया कर्जरूपात देण्यास तयार होती, परंतु ही योजना बारगळली. या योजनेतून राज्यभरात निवडण्यात आलेल्या १० पैकी नऊ प्रकल्प मार्गी लागले. राज्यातील क्लस्टर डेव्हलपमेंट कार्यक्रमांतर्गत रखडलेला पेणचा गणेशमूर्ती कला हा एकमेव प्रकल्प आहे. यामुळे गणपती खारखानदारांचे नुकसान होत आहे. या व्यावसायाला संघटीतपणा नाही. संघटीतपणा आणण्यासाठी क्लस्टर योजना पूर्ण केली पाहिजे.

# जाणून घ्या अभियंता दिनाचा इतिहास अन् महत्त्व

दरवर्षी १५ सप्टेंबर हा भारतात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. वास्तविक, हा दिवस भारताचे महान अभियंता आणि भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरैया यांचा वाढदिवस आहे. ते भारतातील महान अभियंत्यांपैकी एक होते. त्यांनी आधुनिक भारताची निर्मिती केली आणि देशाला नवे रूप दिले. त्यांनी अभियांत्रिकी क्षेत्रात असाधारण योगदान दिले आहे, जे कोणीही विसरू शकत नाही. देशभरात बांधलेल्या अनेक नद्यांची धरणे आणि पूल यशस्वी करण्यात विश्वेश्वरय्या यांचा मोठा हात आहे. त्याच्यामुळे देशातील पाण्याचा प्रश्न सुटला. अभियंता दिनाचा उत्सव कधी सुरू झाला ते जाणून घेऊया.

भारत सरकारने १९६८ मध्ये डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जन्मतारखेला 'अभियंता दिन' म्हणून घोषित केले. तेव्हापासून दरवर्षी १५ सप्टेंबर रोजी अभियंता दिन साजरा केला जातो. वास्तविक, विश्वेश्वरय्या यांचा जन्म १५ सप्टेंबर १८६० रोजी म्हैसूर (कर्नाटक) च्या कोलार जिल्ह्यात झाला. अभियंता म्हणून डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांनी देशात अनेक धरणे बांधली आहेत, ज्यात म्हैसूरमधील कृष्णराज सागर धरण, पुण्यातील खडकवासला जलाशय आणि ग्वाल्हेरमधील तिग्रा धरण यांचा समावेश आहे. एवढेच नाही तर हैदराबाद शहर बनवण्याचे संपूर्ण श्रेय डॉ विश्वेश्वरय्या यांना जाते. त्यांनी तेथे पूर संरक्षण प्रणालीची रचना केली, त्यानंतर ते संपूर्ण भारतात प्रसिद्ध झाले. विशाखापट्टणम बंदराचे समुद्री कटाव होण्यापासून संरक्षण करण्यासाठी एक यंत्रणा विकसित करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता.

अभियंता दिन केवळ भारतातच नव्हे तर इतर अनेक देशांमध्ये साजरा केला जातो. १६ जून रोजी अर्जेंटिनामध्ये, ७ मे रोजी बांगलादेशात, १५ जून रोजी इटलीमध्ये, ५ डिसेंबर रोजी तुर्कीमध्ये, २४ फेब्रुवारीला इराणमध्ये, २० मार्च रोजी बेल्जियममध्ये आणि १४ सप्टेंबर रोजी रोमानियामध्ये अभियंता दिन म्हणून जातो. वास्तविक, हा दिवस जगभरातील अभियंत्यांना प्रोत्साहित करण्यासाठी साजरा केला जातो, जेणेकरून ते त्यांच्या कौशल्यांमुळे देश आणि जगाला प्रगतीच्या नवीन मार्गावर नेतील.

**(साभार : वेबदुनिया)**

## बदलते तंत्रज्ञान

# दुर्मीळ धातूंपासून बनतो आयफोन, वाचा डिटेल्स..



आयफोनचे नवे मॉडेल बाजारात येताच त्याबद्दल ग्राहकांमध्ये उत्सुकता वाढते. जेव्हा जेव्हा अॅपलचा नवीन आयफोन बाजारात येतो तेव्हा तेवढीच उत्सुकता दिसून येते. असे मानले जाते की आयफोन सर्वोत्तम वस्तुंपासून तयार केला जातो. यामध्ये जगातील अनेक धातू वापरले जातत. यात महाग आणि दुर्मीळ धातुंचाही समावेश आहे.

अॅपलने आपलाय बहुप्रतिक्षित आयफोन १५ सीरीज लॉन्च केली आहे. या नवीन लॉन्चमुळे अॅपल सीरीजचे काही जुने फोन स्वस्तही झाले आहेत. दरम्यान, तुम्हाला ऐकून नवलं वाटेल की, आयफोन बनवताना स्क्रीनपासून बॅटरीपर्यंत, अनेक धातूंचा वापर केला जातो. त्यापैकी बरेच महाग धातू आहेत. यामुळेच आयफोनची किंमतही इतर फोनपेक्षा जास्त असते.

आयफोनमध्ये अंदाजे ३० रासायनिक घटक आहेत, ज्यात अॅल्युमिनियम, तांबे, लिथियम, चांदी आणि सोन्याचा समावेश आहे. याशिवाय, यात पृथ्वीच्या पोटात आढळणारे काही दुर्मिळ घटकही असतात. आयफोनचा कॅमेरा सॅफायर ग्लासचा बनलेला आहे, तर त्याच्या बॉडीसाठी विशेष प्रकारचा अॅल्युमिनियम वापरण्यात येते. हे अॅल्युमिनियम स्क्रॅचपासून संरक्षण करते.

आयफोन सोन्या-चांदीने बनलेला आहे, असे म्हटल्यास आश्चर्य वाटू देऊ नका. फोनच्या इलेक्ट्रॉनिक घटकांमध्ये सोने, चांदी, तांबे आणि टंगस्टन वापरले जातात, तर मायक्रो कॅपेसिटर टॅंटलमचे बनलेले असते. फोनचे प्रोसेसर चिप सिलिकॉनची बनलेली आहे. याशिवाय, यात ग्रेफाइट, कोबाल्ट, लिथियम आणि अॅल्युमिनियमचा वापर केला जातो. फोनची बॅटरी लिथियम कोबाल्ट ऑक्साईडपासून बनवलेली आहे. ६० टक्के बॅटरी कोबाल्ट आणि इतर धातूंनी बनलेली असते.

आयफोनचा आवाज इतर कोणत्याही मोबाइल फोनपेक्षा स्पष्ट आणि चांगला आहे. यासाठीही उच्चप्रतिचे धातू वापरले जातात. यामध्ये निकेल, बोरॉन, लोह, डिस्प्रोशिअम आणि निओडीमियम या धातूंचा वापर केला जातो.

मोबाईलची पारदर्शक स्क्रीनदेखील अनेक धातू मिसळून बनवली जाते. आयफोनची स्क्रीन सर्वात खास आहे. ही अॅल्युमिनियम, सिलिकॉन, पोटॅशियम, इंडियम, टिन आणि अनेक दुर्मीळ धातूंचे मिश्रण करून बनविली जाते. त्यामुळेच आपल्याला आयफोनच्या स्क्रीनवर अतिशय स्पष्ट दृष्य दिसतात. ही दिसायलाही आकर्षक आहे.

# मराठी लेखक, अर्थतज्ज्ञ गंगाधर गाडगीळ

निमित्त



मराठी लेखक, अर्थतज्ज्ञ व साहित्यसमीक्षक गंगाधर गाडगीळ यांचा आज स्मृतीदिन आहे. मराठी साहित्यात कथा या साहित्यप्रकारातील त्यांच्या योगदानामुळे त्यांना 'नवकथेचे अध्वर्यू' असे संबोधले जाते.

मुंबईत २५ ऑगस्ट इ.स. १९२३ रोजी जन्मलेल्या गाडगीळांचे शालेय शिक्षण गिरगावातील 'आर्यन एज्युयूकेशन सोसायटी'च्या शाळेत झाले. या शाळेत इ.स. १९३८ मध्ये मॅट्रिक झाल्यानंतर इ.स. १९४४ मध्ये त्यांनी चर्नीरोड येथील विल्सन महाविद्यालयातून अर्थशास्त्र, राज्यशास्त्र व इतिहास या विषयांमधून एमए केले. एमए झाल्यानंतर दोन वर्षांनी गाडगीळ यांनी आपल्या प्राध्यापकीला सुरुवात केली. आरंभीच्या काळात सुरतच्या किकाभाई प्रेमचंद या महाविद्यालयात व नंतर मुंबईतील पोद्दार, सिडनहॅम आणि रुपारेल या महाविद्यालयांत त्यांनी प्राध्यापक म्हणून काम पाहिले. इ.स. १९६४ ते इ.स. १९७१ या काळात ते मुंबईच्या नरसी मोनजी कॉलेज ऑफ कॉमर्स न्ड इकॉनॉमिक्सचे प्राचार्य होते. इ.स. १९७१ तेइ.स. १९७६ या कालावधीत आपटे समूहाचे सल्लागार व त्यानंतर वालचंद उद्योगसमूहात आर्थिक सल्लागार ही पदे त्यांनी सांभाळली.

लहानपणापासून गाडगीळांना वाचनाची आवड होती. त्यातूनच पुढे कॉलेजमध्ये असताना त्यांनी आपल्या लेखनाला सुरुवात केली. 'प्रिया आणि मांजर' ही त्यांची पहिली कथा जून इ.स. १९४१ मध्ये 'वाङ्मयशोभा' या मासिकात प्रकाशित झाली. पुढे बरीच प्रसिद्धी मिळालेली 'बाई शाळा सोडून जातात' ही त्यांची कथा देखील 'वाङ्मयशोभा' याच मासिकात इ.स. १९४४ मध्ये प्रसिद्ध झाली होती. काही कालावधीनंतर 'मानसचित्रे' हा त्यांचा पहिला कथासंग्रह इ.स. १९४६ साली प्रकाशित झाला.

यानंतर ठरावीक काळाने त्यांचे लेखन प्रकाशित होत राहिले. विशेषतः कडू आणि गोड (इ.स. १९४८), नव्या वाटा (इ.स. १९५०), भिरभिरे (इ.स. १९५०), संसार (इ.स. १९५१), उध्वस्त विश्व (इ.स. १९५१), कबुतरे (इ.स. १९५२), खरं सांगायचं म्हणजे (इ.स. १९५४), तलावातले चांदणे (इ.स. १९५४), वर्षा (इ.स. १९५६), ओले उन्ह (इ.स. १९५७) हे त्यांचे उल्लेखनीय कथासंग्रह आहेत. वेगळी वाट चोखाळणाऱ्या या कथासंग्रहांमुळेच 'नवकथेचे अध्वर्यू' हे नामाभिधान त्यांना प्राप्त झाले.

इ.स. १९५५ मध्ये पंढरपूर येथे झालेल्या साहित्य संमेलनात कथाशाखेचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. पुढे इ.स. १९५७ मध्ये रॉकफेलर फाउंडेशनची एक वर्षाची अभ्यासवृत्ती घेऊन ते हार्वर्ड आणि स्टॅनफोर्ड विद्यापीठात गेले. मध्यप्रदेश मधीलरायपूर येथे इ.स. १९८१ मध्ये भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. ऑक्टोबर १ इ.स. १९८३ रोजी मुंबईत झालेल्या मराठी विनोद साहित्य संमेलनाचे उद्घाटन गाडगीळांच्या हस्ते झाले होते.

'मुंबई मराठी साहित्य संघ' व 'मराठी साहित्य महामंडळ' या संस्थांचे अध्यक्ष तसेच साहित्य अकादमीच्या कार्यकारी मंडळावर सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले होते. मुंबईतील ग्राहक पंचायतीत सुमारे ३५ वर्षे त्यांचा सक्रिय सहभाग होता. याच ग्राहक पंचायतीचे ते २५ वर्षे अध्यक्ष देखील होते. एका बाजूला उद्योजक संस्थांचे सल्लागार तर दुसऱ्या बाजूला ग्राहक पंचायतीचे कार्यकर्ते या कामांचा त्यांनी उत्तम समन्वय साधलेला होता. १५ सप्टेंबर २००८ साली त्यांचे निधन झाले.


**पुरस्कार**

इ.स. १९९६ चा साहित्य अकादमी पुरस्कार - 'एका मुंगीचे महाभारत', जनस्थान पुरस्कार, वासंती गंगाधर गाडगीळ विश्वस्त निधीतर्फे मराठी साहित्यात प्रायोगिक व नावीन्यपूर्ण लेखन करणाऱ्या लेखकाला इ.स.१९९४ सालापासून दर तीन वर्षांनी, 'गंगाधर गाडगीळ साहित्य पुरस्कार' दिला जातो.

**सौजन्य : मराठी विकिपीडिया**

**क्लिक...क्लिक...!**





**पनवेल : अलिकडच्या काळात मात्र ग्रामीण भागातही घरगुती पातळीवर गावरान कोंबड्यांची पैदास कमी होऊ लागली. या पार्श्वभूमीवर अगदी गावरान कोंबडी कोबड्यांसारख्या दिसणाऱ्या कोंबड्यांची पैदास सुरू झाली. या कोंबडीची अंडी कृत्रिमरीत्या उबवली जातात. १५ ते २० रुपयांना एक पिल्लू विकले जाते. तीन-चार महिने हे पिल्लू बंदिस्त जाळीत धान्य टाकून पोसले की ते विक्रीसाठी तयार होते. अलीकडे याच पद्धतीने तयार होणाया कोंबड्या विक्रीसाठी बाजारात मोठ्या प्रमाणात येतात.** (छाया : तन्वी पवार)

## आरोग्य प्रहर

# गुलकंद खाण्याचे शरीराला अनेक फायदे



आपण नेहमी पानामधून गुलकंद खात असतो. पण तुम्ही याचे नियमित सेवन केले तर तुम्हाला नक्कीच याचा फायदा मिळतो. शरीराला याचे काय महत्त्वाचे फायदे होतात हे आम्ही तुम्हाला सांगत आहोत. विशिष्ट आजारांवर गुलकंदाचा चांगला प्रभाव दिसून येतो. त्यामुळे तुम्ही याचा समावेश तुमच्या दैनंदिन आयुष्यात नक्कीच करून घ्यायला हवा.

**वजन कमी करण्यासाठी**

गुलकंदातील औषधीय गुणांमुळे वजन कमी करण्यासाठी याचा उपयोग होतो. तुम्ही याचे सेवन करून वजन नियंत्रणात ठेऊ शकता. गुलकंद तयार करण्यासाठी ज्या गुलाबांच्या पाकळ्यांचा उपयोग केला जातो, त्यामध्ये अजिबात फॅट नसते. त्यामुळे लो - फॅट खाद्यापदार्थांच्या सेवनामध्ये वजन कमी करण्यासाठी गुलकंदाचा उपयोग केला जातो.

**तोंडाला आत पुळ्या आल्यास**

गुलकंदामध्ये विटामिन बी चे प्रमाण अधिक असते. एका शोधानुसार, विटामिन बी कॉम्प्लेक्सची कमतरता असल्यास, तोंड येण्याची समस्या सुरू होते. त्यामुळे यावर उत्तम उपाय म्हणजे गुलकंद खाणे. विटामिन बी कॉम्प्लेक्सच्या कमतरतेशिवाय यातील थंडाव्यामुळेही शरीरातील उष्णता कमी होऊन उपाय लागू पडतो.

**डोळ्याच्या थंडाव्याकरिता**

डोळ्यांखाली येत असणारी सूज आणि डोळे लाल होण्याची समस्या असेल तर ही तुमच्या शरीरातील अति उष्णतेमुळे निर्माण होणारी समस्या आहे. त्यामुळे यावर तुम्ही गुलकंदाचा उपाय नक्कीच करून पाहू शकता. रोज तुम्ही एक लहान चमचा गुलकंदाचे सेवन केल्यास, शरीरामध्ये थंडावा निर्माण होऊन डोळ्यांच्या उष्णतेची ही समस्या दूर होण्यास मदत मिळते.

**पोटात गॅस निर्माण झाल्यास**

गुलकंद हे गुलाबाच्या पाकळ्यापासून बनवले जाते हे सर्वांनाच माहीत आहे, ज्या अत्यंत गुणकारी असतात. असे म्हटले जाते की, गुलाबाचा वापर हा पचनतंत्रासाठी अत्यंत उपयुक्त ठरतो. पचनतंत्र सुधारण्यासाठी आणि बद्धकोष्ठतेची समस्या नीट करण्यासाठीही याचा उपयोग होतो. बद्धकोष्ठतेमुळेच गॅसची समस्या निर्माण होते. अन्नाचे अपचन हे गॅस होण्याचे मुख्य कारण आहे. पण गुलकंद खाण्याने या समस्येतून तात्पुरती सुटका नक्कीच मिळते.

# आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते आयुष्मान भव मोहिमेचा शुभारंभ

**पेण : प्रतिनिधी**

उपजिल्हा रुग्णालय पेण येथे आमदार रविशेठ पाटील यांच्या उपस्थितीत मोहिमेला तालुका स्तरावर शुभारंभ करण्यात आला. या वेळी ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी किशोर देशमुख, पेण पोलीस निरिक्षक देवेंद्र पोळ, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अपर्णा खेडेकर, उपजिल्हा रुग्णालय पेणच्या वैद्यकीय अधिक्षक डॉ. संध्यादेवी राजपुत, भाजप तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील आदी उपस्थित होते.



आमदार रविशेठ पाटील यांनी, डॉक्टर हे देवदुताचे कार्य करीत असतात. शासन आरोग्याच्या दृष्टीने अनेक सुविधा देत आहेत. आपला दवाखानामार्फत शासनाने रुग्णांची जबाबदारी आपल्या खांद्यावरच घेतली आहे, असे सांगून आयुष्मान भव पंधरवड्यासाठी शुभेच्छा दिल्या.

तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अपर्णा खेडेकर यांनी, आयुष्यमान भव पंधरवड्यात क्षयरोग, कुष्ठरोग, स्वच्छता, रक्तदान, अवयवदान याबाबत काम केले जाणार आहे. तालुक्यात १९३ क्षयरोगरुग्ण असून त्यांना दत्तक योजनेवर निक्षय मित्रांकडे सुपूर्द केले आहे. आरसीएफकडून १५० रुग्णांसाठी अन्नाचे पॅकेज पुरवले जात आहेत, तसेच ४० निक्षय मित्र हे आरोग्य खात्यातील काम करीत आहेत. क्षयरोग आणि कृष्ठरोग लपवून ठेवू नये त्याची माहिती आरोग्य खात्याला दिल्यास त्यावर त्वरीत उपचार करून बरा करता येईल.

सीकेल सेलच्या रुग्णांचीदेखील तपासणी केली जाणार आहे. यांसह अनेक उपक्रम घेणार असल्याचे सांगितले. या वेळी अवयवदानाबाबत प्रतिज्ञा घेण्यात आली.

## माणगावात नेत्रतपासणी शिबिराला प्रतिसाद

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व उद्योजक विजय मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवारी (दि. १३) नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले होते. नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी नवीन ८४ रुग्णांची तपासणी करून ३५ रुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. शिबिरासाठी महेंद्र मेथा यांनी विनामूल्य जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे मेथा परिवारातर्फे विजय मेथा, मनीष मेथा, विधिता मेथा यांनी विशेष आभार व्यक्त केले.

## पोलादपूरचा राजा गणेशोत्सवामध्ये विविध कार्यक्रम

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूरचा राजा सार्वजनिक गणेशोत्सवामध्ये भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करीत असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष संतोष चिकणे यांनी दिली.

१९ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता गणेश आगमन व प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर पुढील १० दिवस रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, संगीत भजन, कॅरम स्पर्धा व बुद्धिबळ स्पर्धा, सनातन प्रभाततर्फे कार्यक्रम, श्रीसत्यनारायणाची महापुजा, कै. विजय सकपाळ स्मरणार्थ ओम जिम्नॅशियमतर्फे निलेश सुतार यांच्या सौजन्याने शरीरसौष्ठव स्पर्धा, रक्तदान शिबिर, दिशा ग्रुपचे सांस्कृतिक कार्यक्रम, सार्वजनिक उत्सव मंडळाचे भजन, श्रीदेवी गंगामाता सभागृहामध्ये महाप्रसाद तर अनंतचतुर्दशीच्या सकाळी पोलादपूरचा राजाला १०१ ताटांचा नैवेद्य आणि श्रीगणेशविसर्जन मिरवणूक होणार आहे.

## श्री बहिरेश्वर मंदिरात हरीविजय ग्रंथ समाप्ती सोहळा

**नागोठणे : प्रतिनिधी**

शिहू येथील श्री बहिरेश्वर जोगेश्वरी मंदिरात हरीविजय ग्रंथाचे पारायण करण्यात आले होते. याची समाप्ती सोमवारी (दि.११) भक्तीमय वातावरणात झाली.

या वेळी ग्रंथ वाचनासाठी व निरूपणासाठी जनार्धन पाटील, वेट्या मोकल, महादेव म्हात्रे, भास्कर म्हात्रे, वसंत मोकल, ज्ञानदेव म्हात्रे, के. के. कुथे, जानू कुथे, बाळाराम पाटील, दिनेश ठाकूर, रघुनाथ खाडे, भरत घासे, देविदास भूरे, हिराजी भूरे, खंडू कुथे, एकनाथ घासे, जोमा कोकाटे, विजय पाटील, घनश्याम कुथे, हरिचंद्र मोकल, मंजुळा म्हात्रे, वनिता म्हात्रे वक्ते म्हणून लाभले होते.

## 'मुरूड नगर परिषदेने स्वच्छतेकडे लक्ष द्यावे'

**मुरूड : प्रतिनिधी**

शहरात गणपती हा सण मोठ्या प्रमाणात साजरा होत असतो. अशवेळी शहराच्या स्वच्छतेकडे नगर परिषदेने प्राध्यान्याने लक्ष देणे खूप आवश्यक आहे. पावसामुळे मुरुड शहरात गवत वाढलेले आहे, तसेच ठीक ठिकाणी पाणी साचले आहे. त्यामुळे डासांचे प्रमाण वाढले आहे यासाठी औषध फवारणी तातडीने करावी अशी मागणी पद्मदुर्ग व्यावसायिक संघटनेचे अध्यक्ष अरविंद गायकर यांनी केली आहे.

त्यांनी निवेदनात नमूद केले आहे की, बाप्पाच्या आगमनापूर्वी शहराच्या स्वच्छतेवर भर देऊन तसेच शहरामध्ये पावसाचे आगमन जोरात सुरू असल्याने मच्छरचे साम्राज्य पसरले आहे. याकरीता औषध फवारणी करणे अत्यंत गरजेचे आहे. नगर परिषदेने या बाबीकडे गांभीर्यपूर्वक पाहणे आवश्यक आहे.

## स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव

तमाम लोकांना जाहीर करण्यात येते की, कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल या संस्थेचे खालील नामनिर्देशित केलेले सभासद थकबाकीदार आहेत. त्यांचेकडील थकबाकीची रक्कम वसुल करणेसाठी त्यांच्या खालील स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव त्याचे नावासमोर दर्शवलेल्या वेळी, रोजी, ठिकाणी होणार आहे. तरी, ज्यांना सदर मिळकतीच्या लिलावात बोली बोलून घ्यावयाची असेल त्यांनी संस्थेशी संपर्क साधून मिळकतीची प्रत व ठिकाण पाहून घ्यावे व लिलावाच्या दिवशी व वेळी उपस्थित रहावे.

| अ. नं. | थकबाकीदाराचे नाव व पत्ता | मिळकत नं व गट नं. ठिकाण | क्षेत्र हे. आर. | लिलाव करावयाचा हिस्सा | आकार रू. पै. | लिलावाची तारीख, वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. लक्ष्मण मनु चेहरा रा. लोटस बिल्डिंग, ए विंग, ५ वा मजला, रूम नं. ५०२, चॅनल उपवन जवळ, साईनगर, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड | मौजे पनवेल महानगर पालिका हद्दीतील प्लॉट नं. ५२१/१, २, सब प्लॉट नं. २७ ते ३५, किनारा को. ऑप. हौ. सो. लि. बावन बंगला, पनवेल या इमारतीमधील ब्लॉक नं. १. तळमजला, बी / २ विंग, क्षेत्र ४२०.३४ चौ. फुट. | क्षेत्र ४२०.३४ चौ.फुट | क्षेत्र ४२०.३४ चौ.फुट | | शनिवार दिः ३०/०९/२०२३ वेळ: सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० वाजता. कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल रो हाऊस, प्लॉट १, ६२६,मारूती अपार्टमेंट पनवेल ४१०२०६. |

टिप– १) लिलावाचे अटी व शर्तीचे वाचन लिलावाचे वेळी करण्यात येईल.
२) लिलावापूर्वी कर्ज खाते बंद झाल्यास लिलाव रद्द केला जाईल.
३) येणे रक्कमेचा विचार करून मालमत्तेची विक्री केली जाईल.
४) कोणतेही कारण न दाखवता लिलाव मंजूर अगर नामंजूर करणे व पुढे ढकलणे याबाबतचे अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.
५) अपसेट व्हॅल्यू रू. ३७,६८,९९१ /– (अक्षरी रूपये सदोतीस लाख अडुसष्ठ हजार नऊशे एक्यान्नव मात्र) याचे वरती बोली करावी लागेल.

**ठिकाण: पनवेल**
**दिनांक १४/०९/२०२३**

**सही/–**
**सुनिल सदानंद गद्रे**
**वसुली अधिकारी**
**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**

## जप्त केलेल्या व ताबे कब्जात असलेल्या स्थावर मालमत्तेच्या विक्रीची जाहीर नोटीस

जा.क. २९/३४६ वसुली स्थावर जाहीरनामा
वसुली अधिकारी यांचे कार्यालय
दिनांक : १४/०९/२०२३

ज्या अर्थी कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल या संस्थेच्या कर्जाची थकबाकी अधिक व्याज रक्कम रू. ३८,९५,९७८/– (अक्षरी रूपये अडोतीस लाख पंच्यान्नव हजार नऊशे अठ्याहत्तर मात्र) येणेपोटी श्रीमती ज्योती किरण कल्याणकर व श्री. किरण दत्तात्रय कल्याणकर रा. फ्लॅट नं. बी./१/८, किनारा को ऑप. हौ. सो., पनवेल, ता– पनवेल, जि–रायगड यांची खाली नमुद केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. ज्या अर्थी सदरील रक्कम जप्तीमुळे व विकीमुळे उद्भणाऱ्या कायदेशीर भार व खर्च वसुली करीता उक्त मालमत्ता जाहीर लिलाव पध्दतीने विकणे आवश्यक वाटल्यावरून अशी नोटीस देण्यात येते की, सदर श्रीमती ज्योती किरण कल्याणकर व श्री. किरण दत्तात्रय कल्याणकर रा. फ्लॅट नं. बी/१/८, किनारा को.ऑप. हौ. सो., पनवेल, ता–पनवेल, जि–रायगड यांनी उक्त स्थावर व तिच्यापासून मिळणारा भोगवटा व तिची अगर त्यामधील काही भागाची विल्हेवाट लावून मिळणारा लाभांश या सर्व प्रकारच्या हक्कांचा सोबत जोडलेल्या लिलावाच्या अटी व शर्तीस व ठरविलेल्या किंमतीस (अपसेट प्राईज) यांना अधिन राहून जास्तीत जास्त बोली बोलणाऱ्यास दि. ३०/०९/२०२३ रोजी ठिक ११.०० वाजता कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित पनवेल चे कार्यालय श्री. सुनिल सदानंद गद्रे वसुली अधिकारी हे मौजे पनवेल महानगर पालिका हद्दीतील बावन बंगला येथील फायनल प्लॉट नं. ५२१/२ वरील किनारा को. ऑप. हौ. सोसायटी मधील फ्लॅट नं. सी ३/२, तळमजला, ५९३.३२ चौ.फुट बिल्टअप या मिळकतीचे जाहीर लिलावाने विकी करतील.

### स्थावर मिळकतीचा तपशील

| अ. | वसुली दाखला क्रमांक व दिनांक | ज्या पत्रकाराविरूध्द प्रमाणपत्र देण्यात आले असेल त्याचे नाव | गावाचे नाव व तालुका | गट नं. | क्षेत्र | आकारणी | कब्जेदार सदरी असणारे नाव | हक्क | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | दावा क. ६७ २०१८–१९ जा.क. २६९८ /सहानि/ पनवेल / ता. १६/०५/२०१९ पनवेल/बी. ५/क. १०१ सन २०१८–१९ | श्रीमती ज्योती किरण कल्याणकर श्री. किरण दत्तात्रय कल्याणकर श्री. किरण पांडुरंग सावळेकर | पनवेल महानगर पालिका, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड | मौजे पनवेल महानगर पालिका हद्दीतील बावन बंगला येथील फायनल प्लॉट नं.५२१ / २ वरील किनारा को. ऑप. हौ. सो. लि. मधील फ्लॅट नं. सी ३/२, तळमजला. | ५९३. ३२ चौ. फुट बिल्टअप ही मिळकत | — | श्रीमती ज्योती किरण कल्याणकर श्री. किरण दत्तात्रय कल्याणकर | नाही | |

उक्त मालमत्तेसंबंधी अन्य कोणत्याही व्यक्तीने प्रतीपादन करण्यात आलेला त्याचा मालकी हक्क भार अगर हितसंबंध याबाबतच्या खरेपणाची कसलीही हमी देण्यात येणार नाही. विकी आदेश काढण्यात आलेल्या तारखेस थकबाकीदाराकडून देणे असलेली येणे बाकी अधिक व्याज रू. ३८,९५,९७८/– अधिक सरचार्ज व इतर खर्चाच्या वसुलीसाठी विकीचा आदेश देण्यात आला आहे.

वसुली अधिकारी श्री. सुनिल सदानंद गद्रे यांनी उक्त मालमत्ता यापूर्वीच जप्ती आदेश क. वसुली स्थावर जप्ती – दिनांक १५/०२/२०२३ अन्वये जप्त केली आहे.

**ठिकाण: पनवेल**
**दिनांक १४/०९/२०२३**

**सही/–**
**सुनिल सदानंद गद्रे**
**वसुली अधिकारी**
**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**

## जप्त केलेल्या व ताबे कब्जात असलेल्या स्थावर मालमत्तेच्या विक्रीची जाहीर नोटीस

जा.क. २९/३४७ वसुली स्थावर जाहीरनामा
वसुली अधिकारी यांचे कार्यालय
दिनांक : १४/०९/२०२३

ज्या अर्थी कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल या संस्थेच्या कर्जाची थकबाकी रक्कम अधिक व्याज रू. ३८,२३,९५१ /– (अक्षरी रुपये अडोतीस लाख तेवीस हजार नऊशे एकावन्न मात्र) येणेपोटी श्री. लक्ष्मण मनु चेहरा रा. लोटस बिल्डिंग, ए विंग, ५ वा मजला, रूम नं. ५०२, चॅनल उपवन जवळ, साईनगर, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड यांनी त्यांच्या कर्जापोटी तारण दिलेली श्री. किरण दत्तात्रय कल्याणकर व श्रीमती ज्योती किरण कल्याणकर यांची किनारा को. ऑप. हौ. सोसायटी मधील फ्लॅट नं. बी. २. तळमजला, प्लॉट नं. ५२१/१, २. सब प्लॉट नं. २७ ते ३५, किनारा को ऑप. हौ. सो., पनवेल, ता–पनवेल, जि–रायगड ही मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. ज्या अर्थी सदरील रक्कम जप्तीमुळे व विकीमुळे उद्भवणाऱ्या कायदेशीर भार व खर्च वसुली करीता उक्त मालमत्ता जाहीर लिलाव पध्दतीने विकणे आवश्यक वाटल्यावरून अशी नोटीस देण्यात येते की, सदर श्री. किरण दत्तात्रय कल्याणकर व सौ. ज्योती किरण कल्याणकर, रा. फ्लॅट नं. बी. २, तळमजला, प्लॉट नं. ५२१/१ २. सब प्लॉट नं. २७ ते ३५. किनारा को. ऑप. हौ. सो. पनवेल, ता–पनवेल, जि–रायगड यांनी उक्त स्थावर व तिच्यापासून मिळणारा भोगवटा व तिची अगर त्यामधील काही भागाची विल्हेवाट लावून मिळणारा लाभांश या सर्व प्रकारच्या हक्कांचा सोबत जोडलेल्या लिलावाच्या अटी व शर्तीस व ठरविलेल्या किंमतीस (अपसेट प्राईज) यांना अधिन राहून जास्तीत जास्त बोली बोलणाऱ्यास दि. ३०/०९/२०२३ रोजी ठिक ११.०० वाजता कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित पनवेल चे कार्यालय श्री. सुनिल सदानंद गद्रे वसुली अधिकारी हे मौजे पनवेल महानगर पालिका हद्दीतील फ्लॅट नं. बी. २, तळमजला, प्लॉट नं. ५२१ / १, २, सब प्लॉट नं. २७ ते ३५, किनारा को. ऑप. हौ. सो., पनवेल, या मिळकतीचे जाहीर लिलावाने विक्री करतील.

### स्थावर मिळकतीचा तपशील

| अ. | वसुली दाखला क्रमांक व दिनांक | ज्या पत्रकाराविरूध्द प्रमाणपत्र देण्यात आले असेल त्याचे नाव | गावाचे नाव व तालुका | गट नं. | क्षेत्र | आकारणी | कब्जेदार सदरी असणारे नाव | हक्क | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | दावा क. १०९ २०१७/१८ | श्री. लक्ष्मण मनु चेहरा श्री. किरण दत्तात्रय कल्याणकर श्रीमती ज्योती किरण कल्याणकर श्री. कृष्णा बालाजी आवराळे | पनवेल | पनवेल महानगर पालिका हद्दीतील प्लॉट नं. ५२१/१,२ २७ व ३५ वरील किनारा को. ऑप. हौ. सो. लि. फ्लॅट नं. २. तळमजला, बी. २ | ४२०. ३४ चौ. फुट कारपेट | | श्री. किरण दत्तात्रय कल्याणकर श्रीमती ज्योती किरण कल्याणकर | नाही | |

उक्त मालमत्तेसंबंधी अन्य कोणत्याही व्यक्तीने प्रतीपादन करण्यात आलेला त्याचा मालकी हक्क भार अगर हितसंबंध याबाबतच्या खरेपणाची कसलीही हमी देण्यात येणार नाही. विक्री आदेश काढण्यात आलेल्या तारखेस थकबाकीदाराकडून देणे असलेली येणे बाकी अधिक व्याज रू. ३८,२३,९५१/– अधिक सरचार्ज व इतर खर्चाच्या वसुलीसाठी विक्रीचा आदेश देण्यात आला आहे.

वसुली अधिकारी श्री. सुनिल सदानंद गद्रे यांनी उक्त मालमत्ता यापूर्वीच जप्ती आदेश क. वसुली स्थावर जप्ती – दिनांक २७/०१/२०२३ अन्वये जप्त केली आहे.

**ठिकाण: पनवेल**
**दिनांक १४/०९/२०२३**

**सही/–**
**सुनिल सदानंद गद्रे**
**वसुली अधिकारी**
**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**

## जप्त केलेल्या व ताबे कब्जात असलेल्या स्थावर मालमत्तेच्या विक्रीची जाहीर नोटीस

जा.क. २९/३४५ वसुली स्थावर जाहीरनामा
वसुली अधिकारी यांचे कार्यालय
दिनांक : १४/०९/२०२३

ज्या अर्थी कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल या संस्थेच्या कर्जाची थकबाकी अधिक व्याज रक्कम रू. २८,५३,०६८/– (अक्षरी रूपये अठ्ठावीस लाख त्रेपन्न हजार अडुसष्ठ मात्र) येणेपोटी श्री. सचिन बलिराम पाटील रा. घर नं. ६५० रोडपाली पो.नावडे कळंबोली रोड, ता. पनवेल, जि. रायगड यांची खाली नमुद केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. ज्या अर्थी सदरील रक्कम जप्तीमुळे व विक्रीमुळे उद्भवणाऱ्या कायदेशीर भार व खर्च वसुली करीता उक्त मालमत्ता जाहीर लिलाव पध्दतीने विकणे आवश्यक वाटल्यावरून अशी नोटीस देण्यात येते की, सदर श्री. सचिन बळिराम पाटील रा. घर नं. ६५० रोडपाली पो. नावडे कळंबोली रोड, ता. पनवेल, जि. रायगड यांनी उक्त स्थावर व तिच्यापासून मिळणारा भोगवटा व तिची अगर त्यामधील काही भागाची विल्हेवाट लावून मिळणारा लाभांश या सर्व प्रकारच्या हक्कांचा सोबत जोडलेल्या लिलावाच्या अटी व शर्तीस व ठरविलेल्या किंमतीस (अपसेट प्राईज) यांना अधिन राहून जास्तीत जास्त बोली बोलणाऱ्यास दि. ०२/१०/२०२३ रोजी ठिक ११.०० वाजता कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित पनवेल चे कार्यालय श्री. सुनिल सदानंद गद्रे वसुली अधिकारी हे मौजे कळंबोली रोडपाली, ता. पनवेल महानगर पालिका हद्दीतील सेक्टर नं. १३. प्लॉट नं. १ वरील 'ब्लॅकस्मिथ कॉर्नर १' मधील शॉप नं. ०४ तळमजला ज्याचे क्षेत्र ३६० चौ. फुट कारपेट म्हणजेच ४०५ चौ. फुट बिल्टअप या मिळकतीचे जाहीर लिलावाने विकी करतील.

### स्थावर मिळकतीचा तपशील

| अ. | वसुली दाखला क्रमांक व दिनांक | ज्या पत्रकाराविरूध्द प्रमाणपत्र देण्यात आले असेल त्याचे नाव | गावाचे नाव व तालुका | गट नं. | क्षेत्र | आकारणी | कब्जेदार सदरी असणारे नाव | हक्क | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | दावा क. ३३/ २०१९–२० | श्री. सचिन बळिराम पाटील श्री. बलिराम सखाराम पाटील श्री. साईराज काशिनाथ पाटील श्री. रोहिदास चंद्रकांत ठाकूर | कळंबोली रोडपाली, पनवेल महानगर पालिका, पनवेल ता. पनवेल जि. रायगड | मौजे कळंबोली रोडपाली, ता. पनवेल महानगर पालिका हद्दीतील सेक्टर नं. १३. प्लॉट नं. १ वरील 'ब्लॅकस्मिथ कॉर्नर १' मधील शॉप नं. ०४, तळमजला | ३६० चौ. फुट कारपेट म्हणजेच ४०५ चौ. फुट बिल्टअप ही मिळकत | – | श्री. सचिन बळिराम पाटील | नाही | |

उक्त मालमत्तेसंबंधी अन्य कोणत्याही व्यक्तीने प्रतीपादन करण्यात आलेला त्याचा मालकी हक्क भार अगर हितसंबंध याबाबतच्या खरेपणाची कसलीही हमी देण्यात येणार नाही. विक्री आदेश काढण्यात आलेल्या तारखेस थकबाकीदाराकडून देणे असलेली येणे बाकी अधिक व्याज रू. २८,५३,०६८/– अधिक सरचार्ज व इतर खर्चाच्या वसुलीसाठी विक्रीचा आदेश देण्यात आला आहे.

वसुली अधिकारी श्री. सुनिल सदानंद गद्रे यांनी उक्त मालमत्ता यापूर्वीच जप्ती आदेश क. वसुली स्थावर जप्ती – दिनांक २५/०७/२०२३ अन्वये जप्त केली आहे.

**ठिकाण: पनवेल**
**दिनांक १४/०९/२०२३**

**सही/–**
**सुनिल सदानंद गद्रे**
**वसुली अधिकारी**
**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**

## स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव

तमाम लोकांना जाहीर करण्यात येते की, कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल या संस्थेचे खालील नामनिर्देशित केलेले सभासद थकबाकीदार आहेत. त्यांचेकडील थकबाकीची रक्कम वसुल करणेसाठी त्यांच्या खालील स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव त्याचे नावासमोर दर्शवलेल्या वेळी, रोजी, ठिकाणी होणार आहे. तरी, ज्यांना सदर मिळकतीच्या लिलावात बोली बोलून घ्यावयाची असेल त्यांनी संस्थेशी संपर्क साधून मिळकतीची प्रत व ठिकाण पाहून घ्यावे व लिलावाच्या दिवशी व वेळी उपस्थित रहावे.

| अ. नं. | थकबाकीदाराचे नाव व पत्ता | मिळकत नं व गट नं. ठिकाण | क्षेत्र हे. आर. | लिलाव करावयाचा हिस्सा | आकार रू. पै. | लिलावाची तारीख, वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. सचिन बळिराम पाटील रा. घर नं. ६५० रोडपाली पो. नावडे कळंबोली रोड, ता. पनवेल, जि. रायगड | मौजे कळंबोली रोडपाली, ता. पनवेल महानगर पालिका हद्दीतील सेक्टर नं. १३. प्लॉट नं. १ वरील 'ब्लॅकस्मिथ कॉर्नर १' मधील शॉप नं. ०४, तळमजला | ३६० चौ. फुट कारपेट म्हणजेच ४०५ चौ. फुट बिल्टअप | ३६० चौ. फुट कारपेट म्हणजेच ४०५ चौ. फुट बिल्टअप | – | सोमवार दिः ०२/१०/२०२३ वेळ: सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० वाजता. कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल रो हाऊस, प्लॉट १, ६२६, मारूती अपार्टमेंट पनवेल ४१०२०६. |

टिप– १) लिलावाचे अटी व शर्तीचे वाचन लिलावाचे वेळी करण्यात येईल.
२) लिलावापूर्वी कर्ज खाते बंद झाल्यास लिलाव रद्द केला जाईल.
३) येणे रक्कमेचा विचार करून मालमत्तेची विक्री केली जाईल.
४) कोणतेही कारण न दाखवता लिलाव मंजूर अगर नामंजूर करणे व पुढे ढकलणे याबाबतचे अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.
५) अपसेट व्हॅल्यू रू. ३६,३२,१६३ /– (अक्षरी रूपये छत्तीस लाख बत्तीस हजार एकशे त्रेसष्ठ मात्र) याचे वरती बोली करावी लागेल.

**ठिकाण: पनवेल**
**दिनांक १४/०९/२०२३**

**सही/–**
**सुनिल सदानंद गद्रे**
**वसुली अधिकारी**
**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**

## निवडक

### लोकलच्या धडकेने एकाचा मृत्यू

**पनवेल :** लोकल गाडीची ठोकर लागून एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना बेलापूर रेल्वे स्टेशन ते खारघर रेल्वे स्टेशन किमी नं ३८/१३६ च्या जवळ घडली आहे. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ५० वर्ष, उंची पाच फूट तीन इंच, अंगाने सडपातळ, रंग काळा सावळा, डोक्याचे केस काळे पांढरे व वाढलेले, नाक सरळ, चेहरा उभट, दाढी वाढलेली असून अंगात लाल टी शर्ट व निळी फुल पॅन्ट घातलेली आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल रेल्वे पोलीस ठाणे ०२२-२७४६७१२२ किंवा पोलीस उप निरीक्षक एस डी यादव यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### बलजीत सिंग अरोरा अध्यक्षपदी

**नवी मुंबई :** सानपाडा येथील मिलेनियम टॉवर बी टाईप को ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटीची निवडणूक नुकतीच झाली. या निवडणुकीमध्ये निवडून आलेल्या कार्यकारी समितीची १० सप्टेंबर २०२३ रोजी विशेष सभा झाली. या सभेत सोसायटीचे अध्यक्ष म्हणून अरोरा बलजीत सिंग, सचिव म्हणून बाळासाहेब महादेव हांडे तर खजिनदार म्हणून सतीश रोहिदास गायकवाड यांची बहुमताने निवड झाली आहे, तर सदस्य म्हणून सचिन पांडुरंग तावडे, मिया तस्लिम युसुफ, शिरीष अशोक गुजरकर, प्रकाश व्यंकटराव बिरादार, बेला शालिन जोशी, तनुजा राजेश पाटील, कीर्तीदा मिलाप मदलानी, शैलेश हरिलाल रावल, सहदेव सोमेश्वर आंचलकर, माधुरी श्रीकांत जोशी, कांचन भरत चवरे, नागनाथ गणपती सोनवणे, प्रभाकर बनोजी भेरे, निवृत्ती नारायण ढोबळे यांची व्यवस्थापन समितीवर निवड झाली आहे.

### प्रश्नमंजूषेस विद्यार्थ्यांचा प्रतिसाद



**नवी मुंबई :** ज्ञानदीप सेवा मंडळाचे प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, करावेमध्ये विज्ञान प्रश्नमंजुषा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने संपन्न झाला. या कार्यक्रमावेळी डॉ. होमी भाभा संशोधन संस्थेच्या रसायनशास्त्र विभागाच्या प्रमुख इंदिरा प्रियदर्शनी उपस्थित होत्या. विजेत्या स्पर्धकांना संस्थेचे अध्यक्ष रवींद्र नाईक, वैज्ञानिका इंदिरा प्रियदर्शनी, तुषार मुखर्जी व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पदक व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमासाठी संस्कृती संवर्धन प्रतिष्ठान, नवी मुंबई व लायन्स क्लब यांचे मोलाचे सहकार्य लाभले. विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक चंदन, सुप्रिया शिंदे, स्नेहल बोरवडकर, मुख्याध्यापिका दर्शना भोईर व दीपिका म्हात्रे यांनी मेहनत घेतली.

# सानपाडा येथे अवैध फेरीवाल्यांचे बस्तान

## महापालिकेकडे कारवाईची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या सानपाडा सेक्टर ४ येथील दैनंदिन बाजारातील ओट्यांचे वाटप अद्याप झाले नसून ही वास्तू अद्याप खुली झालेली नाही. उद्घाटनाविना असलेल्या या वास्तूचा गैर फेरीवाल्यांकडून घेतला जात आहे. या वास्तूच्या आवारात काही फेरीवाल्यांनी बेकायदेशीररीत्या व्यवसाय सुरू केले असून, त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी आयुक्तांकडे केली आहे.

नागरिकांना दैनंदिन बाजाराची सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी शहरातील सर्वच नोडमध्ये दैनंदिन बाजाराच्या वास्तू पालिकेने उभारल्या आहेत. सानपाडा सेक्टर ४ मधील बाजाराच्या ओट्यांचे वाटप झाले नसून हा बाजार सुरू होण्याच्या प्रतीक्षेत आहे. त्यामुळे नियमित व्यापार करणाऱ्या विक्रेत्यांना रस्त्यावर, फुटपाथवर बसावे लागत आहे. तर दुसरीकडे या संकुलाचे उद्घाटन न झाल्याने त्याचा ताबा अनधिकृत फेरीवाल्यांनी घेतला आहे. बिनदिक्कत येथे बसून व्यवसाय केला जात आहे. त्यामुळे अधिकृत व्यापारी, फेरीवालेदेखील नाराजी व्यक्त करत आहेत.

दैनंदिन बाजाराच्या आवारात बेकायदा व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांवर महापालिका प्रशासनाने कारवाई करावी तसेच सानपाडा विभागातील नागरिकांसाठी महापालिकेने बांधलेली दैनंदिन बाजाराची वस्तू तत्काळ सुरू करण्याची मागणी कचरे यांनी केली आहे.



# शरद खारकर यांच्याकडून दापोली विद्यालयास दोन लाखांची देणगी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दापोली पारगाव येथील अनंत पांडुरंग भोईर विद्यालय व रघुनाथ शेठ जितेकर ज्युनिअर कॉलेज या विद्यालयात गुरुवारी (दि. १४) स्व. रघुनाथ शेठ जितेकर यांच्या आठव्या पुण्यस्मरणानिमित्त बक्षीस वितरण व सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. या वेळी विद्यालयाचे चेअरमन शरद खारकर यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या दातृत्वाचा वारसा घेऊन दापोली पारगाव विद्यालयास एक खोली बांधण्यासाठी होणारी रक्कम देण्याचे मंजूर केले आणि त्याचा पहिला हप्ता दोन लाख रुपयांचा धनादेश लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे सुपूर्द केला.

शरद खारकर यांनी यापूर्वीही वावंजे, गव्हाण शाखा तसेच रायगड विभागीय कार्यालय कामोठे येथे देणगी देऊन समाजसेवेचा वारसा जपला आहे. त्यांच्या या दातृत्वाबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे अभिनंदन केले. रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभात माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, पं. स.चे माजी सभापती काशिनाथ पाटील, सामाजिक कार्यकर्ते प्रकाश कडू, राम हरी म्हात्रे, सुभाष म्हात्रे, गजानन दत्तू म्हात्रे, अनंत पांडुरंग भोईर विद्यालयाचे चेअरमन प्रकाश जितेकर, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका पी. आर. ठाकूर, उप मुख्याध्यापक डी.डी. भर्णूके, पर्यवेक्षिका अतितकर मॅडम, 'रयत'च्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ज्योत्स्ना ठाकूर, माजी सदस्या संजिवनी म्हात्रे आदी उपस्थित होते.

या बक्षीस व सत्कार समारंभामध्ये अनंत पांडुरंग भोईर विद्यालयाच्या नूतन इमारतीच्या बांधकामासाठी ज्या देणगीदारांनी देणगी दिली त्यांचा सत्कार झाला. या वेळी रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, दातृत्वाचे महामेरू लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी ५० लाखांची देणगी देण्याचे घोषित केले.

# नवी मुंबईत सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा पुन्हा सुरू

**नवी मुंबई : बातमीदार**



नवी पालिकेच्या माध्यमातून गेली अनेक वर्षे सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धेचे आयोजन केले जात होते, परंतु कोरोनाच्या वैश्विक महामारीमुळे काही काळासाठी बंद करण्यात आलेली ही स्पर्धा आजतागायत पुन्हा सुरू न झाल्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचा सूर निर्माण झाला होत. याच अनुषंगाने बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी नवी मुंबई महानगरपालिक आयुक्त राजेश नार्वेकर यांना बंद असलेली सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा पुन्हा सुरू करावे, अशी मागणी केली होती. त्यास यश आले असून पालिकेने ही मागणी मान्य करत गणेशोत्सव स्पर्धा पुन्हा सुरू केली आहे.

या स्पर्धात्मक वातावरणामुळे नवनवीन आशयाचे समाज प्रबोधनात्मक देखावे साजरे करण्यास मंडळाच्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहन मिळणार आहे, दिशा मिळणार आहे, प्रेरणा मिळणार आहे, त्याच बरोबर नवी मुंबई महापालिकेसारख्या एका कुटुंब प्रमुख संस्थेकडून पाठीवर कौतुकाची थाप पडणार असल्यामुळे सहाजिकच गणेशोत्सव साजरा करणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये सतत आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण होणार आहे.

नवी मुंबईतील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातील सदस्यांनी तयार केलेले नवनवीन आशयाचे समाज प्रबोधनात्मक देखावे नवी मुंबईतील नागरिकांना पहावयास मिळणार आहे.तसेच नवी मुंबईतील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातील अध्यक्ष, सचिव व सदस्यांनी आमदार मंदा म्हात्रे यांचे आभार मानले आहेत.



**पनवेल : तालुक्यातील वारदोली ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी राम पदू भवर यांची गुरुवारी बिनविरोध निवड झाली. याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यासाठी भाजप पळस्पे जि. प. विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, युवा मोर्चा अध्यक्ष योगेश लहाने, उपसरपंच हेमंत तांडेल, माजी उपसरपंच नारायण भोपी, सदस्य सतीश पाटील, दिनेश पाटील, जितेंद्र बताळे, अनंता पवार आदी उपस्थित होते.**

# खारघरमध्ये गणपती बनवण्याची कार्यशाळा

## चिमुकल्यांनी तयार केला ईकोफ्रेंडली बाप्पा



**खारघर : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब ऑफ खारघर मिड टाउनच्या वतीने ९ व १० सप्टेंबर रोजी चिमुकल्या सोबत मोठ्यांने ही स्वतः हून गणपती बनवायचे स्वप्ना साकार केला. शाडू माती पासून गणपती बनवायची कार्यशाळा ऑफलाईन आणि ऑनलाईन या पद्धतीने खारघरमध्ये झाली. यात जवळपास १५० लोकानी सहभाग घेतला.

शाडू मातीपासून बनवलेला गणपती पर्यावरणपूरक असतो. घरचा घरीदेखील याचा विसर्जन करता येतो. प्रशिक्षक शीतल वारे यांनी सुंदर व सोप्या पद्धतीने कलात्मक गणपती तयार करायचा शिकवले. गणपती तयार झाल्यानंतर चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर समाधान व आनंद दिसत होते. या कार्यक्रमाला रोटरी क्लबचे अध्यक्ष अनुप गुप्ता, सचिव रवी किरण, सेवा प्रकल्पाचे संचालक शैलेश पटेल व इतर रोटरीयन उपस्थित होते. अशीच कार्यशाळा अजून ३-४ ठिकाणी ठेवायचा प्रयत्न आहे, असे अध्यक्ष अनूप गुप्ता यांनी सांगितले.

# बेलापूर सबवेजवळ आढळला मृतदेह


**पनवेल :** बेलापूर रेल्वे स्टेशन फलाट क्रमांक १च्या सबवेच्या शिडीजवळ एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल रेल्वे पोलीस करीत आहेत. प्रेम बहादूर थापा (वय ४५) या मयत व्यक्तीचे नाव असून उंची चार फूट सहा इंच, अंगाने सडपातळ, रंग गोरा, डोक्याचे काळे पांढरे व टक्कल पडलेले, नाक बसके, चेहरा गोल, दाढी साधारण वाढलेली आहे. तसेच त्याच्या अंगात शर्ट घातलेला आहे. तसेच टॉवेल गुंडाळलेला आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल रेल्वे पोलीस ठाणे ०२२-२७४६७१२२ किंवा पोलीस उपनिरीक्षक दशरथ हगवणे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कोकिलाबेन हॉस्पिटलमध्ये गँगरीनवर बायपास सर्जरी

**पनवेल : प्रतिनिधी**

कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल नवी मुंबईने गँगरीनच्या उपचारांमध्ये एक महत्त्वपूर्ण प्रगती केली. ७७ वर्षीय पांडुरंग पै यांना मधुमेह आहे, त्यांच्या पायामध्ये गँगरीनच्या गुंतागुंतीच्या केसवरील उपचार पायाच्या धमनीमध्ये लांब ब्लॉकेजसाठी बायपास सर्जरीचा उपयोग करून केले गेले. नवी मुंबईमध्ये पहिल्यांदा गँगरीनच्या केसवरील उपचारांसाठी बायपास सर्जरी केली गेली. सर्जरी यशस्वी झाली आणि फक्त काही दिवसातच हे रुग्ण आपल्या पायांवर उभे राहू शकले. कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल नवी मुंबईचे कन्सल्टन्ट, आणि एंडोवस्क्युलर सर्जन डॉ. पियुष जैन यांच्या नेतृत्वाखाली हॉस्पिटलच्या मेडिकल टीमच्या प्रयत्नांमुळे ७७ वर्षीय पांडुरंग पै यांचा पाय वाचवून त्यांचे आयुष्य यशस्वीपणे बदलवण्यात आले आहे. ही केस गँगरीनच्या इतर अनेक रुग्णांसाठी आशेचा किरण ठरली आहे. नवी मुंबईमध्ये ही अशाप्रकारची पहिलीच सर्जरी आहे.

ही मॅरेथॉन सर्जरी सहा तास सुरु होती. डॉ जैन आणि त्यांच्या टीमने ही गुंतागुंतीची प्रक्रिया यशस्वी व्हावी यासाठी अतिशय काळजीपूर्वक काम केले. रुग्णाच्या तब्येतीत खूपच छान सुधारणा दिसून आली आणि फक्त दोन ते तीन दिवसांत पुन्हा चालू-फिरू लागण्यासाठी सक्षम बनले. सर्जरीनंतर काही आठवड्यात ते चालू-फिरू लागले होते आणि तीन महिन्यांमध्ये त्यांची जखम देखील पूर्णपणे बरी झालेली असेल.




## घननीळा

रूप घेऊनी मीरेचे
आला श्रावण आला
पायी घुंगरू थेंबाचे
बांधुनी, नाचे घननिळा

नदी वाहे खळाळा
झुळझुळतो ओहळ
प्रीत हिरवी कोवळी
मिरवितो हा कातळ

सोवळ्या या प्रितीपुढे
उणा शब्दांचा सागर
ऐक तुझ्याच काळजात
माझ्या नावाचा जागर



-सृष्टी गुजराथी,
कर्जत




## श्रावणधारा

अल्लड अवखळ मेघ सरींनी,
पानोपानी भिजला श्रावण..
रंगगंधाने सजली धरती,
आनंदाने नटला श्रावण..
धरती ल्याली हिरवा शेला,
अंगोपागी सजला श्रावण..
सहर्ष, सलज्ज प्रीत बहरली,
अंतर्यामी मोहरला श्रावण..
कोकीळ कुजन स्वरात न्हाले,
वनराईने फुलला श्रावण..
हिरव्या रानी, हरपले मन,
मनामनात रुजला श्रावण..
सुखाच्या क्षणी, गोजिऱ्या गाली,
भरजरी लालीत , हसला श्रावण..
बहरात रंगूनी मनाच्या,
चैतन्याने सळसळला श्रावण..
तुझ्या मनात, माझ्या मनात,
आत्मभानाचा फुलला श्रावण..
जीवाला जीवाचा जीवलग भेटता,
मनोमनी हरखला श्रावण..



-अर्चना देशपांडे पोळ
बार्शी




## असा असावा पाऊस

थेंब टपोरे टपोरे
उभी न्हाली धरित्री
फुटले घूमारे घूमारे
हिरवी नक्षी धरणीवर ती
पदरावर ती मयुर पक्षी
गीत पाऊसाचे गाती
तरारावे पिक शेतावर ती
डोलतात कणसे जणू माणिक मोती
अशी यावी भात शेती
भरावी पोत्यावर पोती
भाव कपाशीला हवा
पडाव्यात कडधान्यांच्या राशी
शेतकरी रहावा सुखात
नेहमी असावा सुकाळ
कधी न पोहचावी दुष्काळाची झळ
येओ शेतकऱ्याला बळ
नको आत्महत्या चां विचार
नसावी पाणि कपात
कधी गुरांच्या चाऱ्याची
पडावी ना भ्रांत
पोरे पोरे भिजवी
आनंदाने पाऊसात
असा असावा पाऊस
त्यांचे महत्व जीवनात



-सुनंदा सावंत
पनवेल

## निवडक



### कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम

**माणगाव :** येथील जे. बी. सावंत एज्युकेशन सोसायटीच्या टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजमध्ये ११ ते ३० सप्टेंबरदरम्यान एकूण ४० विद्यार्थ्यांना ४० तासांचे कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येणार आहे. हे प्रशिक्षण जीटीटी फाउंडेशन पुणे व स्वदेश फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने देण्यात येणार आहे. यासाठी मनिष कन्हैयालाल पोंडा मुंबई हे सॉफ्टस्कील प्रशिक्षक म्हणून हजर झाले आहेत. त्याची सुरुवात सोमवारी (दि. ११) करण्यात आली. महाविद्यालय विकास समिती सदस्य रामदास पुराणिक हे अध्यक्षस्थानी होते. सर्व मुलांना महाविद्यालयातर्फे किट देण्यात आली. रामदास पुराणिक यांनी पाच मुले दत्तक घेऊन त्यांच्या प्रशिक्षणाचे शुल्क दिले.

### 'पत्रलेखन स्पर्धेसाठी प्रवेशिका पाठवा'

**अलिबाग** : भारतीय पोस्ट विभागाने ढाई आखर वार्षिक पत्र लेखन प्रतियोगिता २०२३-२४अंतर्गत नये भारत के लिये डिजिटल इंडिया या विषयावर पत्र लेखन स्पर्धेची घोषणा केली असून त्याची प्रवेशिकेची पत्रे चिफ पोस्टमास्टर जनरल, महाराष्ट्र सर्कल यांनी ३१ ऑक्टोबरपर्यंत मागवले आहेत. स्पर्धेसाठी मराठी, हिंदी, इंग्लिश किंवा प्रादेशिक भाषेमध्ये आंतरदेशीय पत्र श्रेणी ५०० शब्द व लिफाफा श्रेणी १००० शब्द यानुसार १८ वर्षापर्यंत व १८ वर्षापुढील सर्व नागरीक या दोन स्वतंत्र वयोगटात भाग घेता येईल. या पत्रावर वयाचे प्रमाणपत्र लिहिणे बंधनकारक आहे. यामध्ये मी प्रमाणित करतो की, मी दि. ०१/०१/२०२३ या तारखेला १८ वर्षाखाली/वर आहे अशी नोंद करणे आवश्यक आहे. फक्त हस्तलिखित पत्र स्पर्धेला पात्र असतील. पत्रे चिफ पोस्टमास्टर जनरल, महाराष्ट्र सर्कल, मुंबई-४००००१ या पत्त्यावर ३१ ऑक्टोबरपर्यंत पाठवावीत अथवा नजिकच्या पोस्ट ऑफिसमध्ये जमा करावीत.

### गागोदे येथे विनोबा भावे यांची जयंती

**खोपोली** : थोर तत्त्वज्ञ, समाजोद्धारक आचार्य विनोबा भावे यांच्या जयंतीनिमित्त विनोबांच्या जन्मस्थान



समितीतर्फे गागोदे येथे विनोबांच्या उपनिषद दृष्टीचे सामाजिक-आध्यात्मिक आकलन या विषयावर मराठी विश्वकोश मंडळाचे सदस्य आणि भारतीय धर्म, इतिहास व संस्कृतचे गाढे अभ्यासक डॉ. हेमंत राजोपाध्ये यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या वेळी गागोदे येथील ट्रस्टी विजय दिवाण, जयंत दिवाण, आदिवासी समाजासाठी कार्य करणाऱ्या सुरेखा दळवी, विनोबांचे अनुयायी श्रीराम जाधव, पेण येथील ज्येष्ठ वकील व शिक्षणमहर्षी ॲड. बापूसाहेब नेने, गांधीवादी कार्यकर्ते व सुत कताई प्रवर्तक माधव सहस्रबुद्धे, युवा चिंतक, लेखक उत्पल चंदावार, सावनी गोडबोले, गागोदे येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. महेश मोकल, नेरे येथील शांतिवन आश्रमाचे गणेश सुर्वे, श्री वाटवे हे विनोबांचे अनुयायी व महाराष्ट्रभरातून आलेले सर्वोदय कार्यकर्ते उपस्थित होते.



**खोपोली : खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी यांना बुधवारी वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना प्रांताधिकारी अजित नैराळे, उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, सहाय्यक पोलीस निरीक्षक हरेश काळसेकर, नायब तहसीलदार सुधाकर राठोड, अपघातग्रस्त मदत टीमचे गुरूनाथ साठीलकर, भोसले, साठीलकर भगिनी आदी उपस्थित होते.** (छाया : जयवंत माडपे)

# विकासकामे करताना पक्षभेद नाही -आमदार महेंद्र दळवी

## शिवसेना विधानसभा कार्यकारिणीची बैठक




**अलिबाग : प्रतिनिधी**

विकासकामे करताना मी, कोण कुठल्या पक्षाचा आहे हे पाहत नाही. लोकांनी मला भरभरून दिले आहे. त्यामुळे येणाऱ्या प्रत्येकाचे काम झाले पाहिजे अशी आपली भूमिका असल्याचे प्रतिपादन आमदार महेंद्र दळवी यांनी केले.

शिवसेनेच्या विधानसभा कार्यकारिणीची बैठक बुधवारी (दि. १३) येथील हॉरिझोन सभागृहात झाली. या वेळी मतदारसंघात झालेली विकासकामे आणि संघटना वाढीवर चर्चा झाली. या वेळी पक्षनिरिक्षक म्हणून शिवसेनेचे उपनेते माजी आमदार सदानंद चव्हाण उपस्थित होते.

सुरुवातीलाच जिल्हाप्रमुख राजा केणी यांनी, पक्षाचे काम करणाऱ्यांकडून विकासकामे केली जावीत, अशी मागणी केली. कुठल्याही पक्षाची माणसे येतात आणि निधी घेऊन जातात हे योग्य नसल्याचे मत व्यक्त केले. हाच धागा पकडत आमदार महेंद्र दळवी यांनी, विकासकामे करताना, कोण कुठल्या पक्षाचा आहे हे मी पाहत नाही, लोकांची कामे झाली पाहिजेत, अशी भूमिका आपली असली पाहिजे, असे मत व्यक्त केले. माझा ट्रॅक बदलला आहे, त्यामुळे माझ्या जुन्या कार्यकर्त्यांना खटकते, पण सध्या आपल्यासमोर तरुणांसाठी नोकऱ्या आणि छोट्या व्यावसायिकांना प्रोत्साहन देण्याचे काम आपल्या करायचे आहे. मला लोकांमध्ये राहणे, त्यांची कामे करणे मला आवडते असेही आमदार दळवी यांनी म्हटले आहे. मतदारसंघात शिवसेना पक्ष तळागाळात नेला पाहिजे, अशी अपेक्षा आमदार दळवी यांनी पदाधिकाऱ्यांकडून केली.

विकास करायचा असेल तर शेकापला हद्दपार करायचे हा आपला मुळ हेतू असला पाहिजे. त्यासाठी शेवटच्या माणसाला डोळ्यासमोर ठेवून काम केले आहे. त्याच्यापर्यंत पोहचलो पाहिजे. बुध तेथे शिवदूत ही संकल्पना राबवण्यात येत असून सर्व शिवदुतांनी आपापले काम चोखपणे करणे आवश्यक असल्याचेही आमदार महेंद्र दळवी यांनी म्हटले आहे.

अलिबाग विधानसभा मतदारसंघात जेवढा निधी याआधी आला आहे, त्यापेक्षा जास्त निधी या चार वर्षांत आला आहे. लोकांनी सर्व दिले आहे, यामुळे शेवटपर्यंत लोकांची कामे करायच्या निर्णय मी आणि मानसी दळवी यांनी घेतला असल्याचेही त्यांनी सांगितले.

## स्वच्छता अभियान जिल्ह्यात प्रभावीपणे राबविणार -डॉ. भरत बास्टेवाड

**अलिबाग : प्रतिनिधी**

स्वच्छ भारत दिवस २०२३च्या निमित्ताने १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये स्वच्छता ही सेवा अभियान प्रभावीपणे राबविले जाणार असल्याची माहिती राजिप मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी दिली.

या अभियानांतर्गत कचरामुक्त भारत करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. ग्रामपंचायतींमध्ये स्वच्छतेचे उपक्रम राबविणे आवश्यक असून, यामध्ये स्वयंस्फूर्तीने श्रमदान करणे गरजेचे आहे. या स्वच्छता मोहिमेत ग्रामीण भागातील बसस्थानके, पर्यटन स्थळे, वारसा स्थळे, नदीकिनारे, घाट, नाले यांसह इतर सार्वजनिक ठिकाणी मोहिम राबविली जाणार आहे. स्वच्छतेसाठी युवकांच्या नेतृत्वाखाली सर्व गटांना एकत्रित करून त्यांच्याकडून स्वच्छतेच्या दृष्टीकोनातून पर्यावरण विशेषतः टेकड्या स्वच्छ करण्यासाठी राज्यभरात १७ सप्टेंबर रोजी स्वच्छता मोहिमेसह इतर उपक्रमांचेही आयोजन करण्याचे निर्देश केंद्र सरकारकडून देण्यात आले आहेत.

केंद्रीय जलशक्ती मंत्रालय, गृहनिर्माण व शहरी विकास मंत्रालय यांच्या हस्ते १५ सप्टेंबर रोजी व्हिडीओ कॉनफरसद्वारे संयुक्तपणे स्वच्छता ही सेवा अभियानाचा शुभारंभ करण्यात येणार आहे. या वेळी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थाचे इतर अधिकारी यांच्यासोबत ऑनलाईन संवाद साधणार आहेत.

स्वच्छता मोहिमेत नेहरू युवा केंद्राचे स्वयंसेवक, राष्ट्रीय सेवा योजनेचे महाविद्यालयीन युवक, बचतगट, व्यापारी संघटना प्रतिनिधी, स्वच्छता प्रेमी नागरिकांनी सहभागी होऊन हे अभियान यशस्वी करावे, असे आवाहन जिल्हा परिषद पाणी व स्वच्छता विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले यांनी केले आहे.

## डंपरच्या धडकेत तीन जनावरांचा मृत्यू

**म्हसळा : प्रतिनिधी**

दिघी-पुणे राष्ट्रीय महामार्गावरून माणगावकडे भरधाव वेगात जाणाऱ्या डंपरने सरवर गावाजवळ रस्त्यावर असलेल्या तीन गोवंशीय जनावरांना धडक दिली. या अपघातात गाय, बैल आणि खोंड ही तिनही जनावरे जागीच ठार झाली. ही घटना मंगळवारी (दि. १२) ८.४५ वा घडला.

प्रवीण शंकर वाघे (वय ४०, रा. चिखलप) यांची तीनही गुरे रस्त्यावर होती. अंधार असल्याने गुरे न दिसल्याने अपघात झाला असावा असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. यात मालकाचे १५ ते २० हजार रु. नुकसान झाले. अपघाताची नोंद म्हसळा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## भाले राजिप शाळेत तृणधान्य पाककृती स्पर्धा उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील राजिप शाळा भाले येथे तृणधान्य पाककृती स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सुमारे एक डझन विविध पाककृती महिला मंडळांनी बनवून आणले होते. यात प्रामुख्याने तांदूळ, गहू, नाचणी, वरी, राजगिरा, मेथीदाणे, ओट्स, सातू इ. प्रकारच्या तृणधान्यांचा वापर करून लाडू, मोदक, वड्या, घावणे, डोसे, गुळभात, खीर, वडे, घारगे, थालिपीठे, शिरा, उपमा, चटण्या, सांजा अश्या विविध नव्या जुन्या पदार्थांची रेलचेल विद्यार्थ्यांना अनुभवायला मिळाली.

आपापल्या पदार्थांची माहिती महिला भगिनींनी परीक्षकांना सांगितली. या स्पर्धेसाठी भाले हायस्कूलच्या मुख्याध्यापिका कळमकर यांनी परीक्षण केले. महिलांसाठी उपयुक्त अशा वस्तू शिक्षकांनी स्वखर्चातून बक्षीस म्हणून दिल्या. अस्मिता चाळके यांनी प्रथम क्रमांक व सपना बाईत यांनी द्वितीय क्रमांक तर भावना धाडवे यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

सूत्रसंचालन दीपक चव्हाण यांनी तर आभार संतोष बापट यांनी मानले. त्यानंतर शाळेतील बच्चेकंपनीपैकी यंदा इ. पहिलीत आलेला सारंग माळी याने सांगितलेली खारट चहाची रेसिपी आणि सर्वेश शिगवण याने सांगितलेली वडापाव बनवण्याची रेसिपी उपस्थितांसाठी हास्य मेजवानी ठरली. अखेर बनवून आणलेल्या सर्व पदार्थांवर विद्यार्थ्यांनी आणि माता पालकांनी ताव मारला.

## शिक्षकांसाठी इनोव्हेशन कोचेससंदर्भात कार्यशाळा

**पाली : प्रतिनिधी**

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डाएट) पनवेल यांच्याद्वारे एससीईआरटी महाराष्ट्र आणि आयराईज आयसर पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिक्षक इनोव्हेशन कोचेस करण्यासंदर्भात तीन दिवसीय विज्ञान आणि गणित कार्यशाळा श्री. छत्रपती विद्यालय व ज्युनियर कॉलेज वावोशी खालापूर येथे बुधवार (दि. १३)पासून सुरू झाली आहे.

या कार्यशाळेनंतर, शिक्षक शाळेतील मुलांमध्ये सर्जनशीलता, समस्या सोडवण्याचा नावीन्यपूर्ण दृष्टीकोन रुजवण्याचा प्रयत्न ७ आय इनोवेशन मॉडेल, प्रशिक्षण पद्धत, सत्राच्या संकल्पना, पद्धती आणि धोरणे यांच्याद्वारे करतील. सर्व सत्रांचे नियोजन दुसऱ्या टप्प्यात इनोव्हेशन चॅम्पियन्स उस्मान शेख, नरेंद्र जाधव, संतोष चौधरी, वर्षाराणी मुंगसे, विद्या साबळे तसेच आयराईझ टीम शिवानी पुलसे टीचींग असोसिएट, सुजित गोंडा टीचिंग फेलो यांच्याद्वारे घेण्यात आले.

आयराईझ टीचर डेव्हलमेंट प्रशिक्षणच्या तिसऱ्या टप्प्यातील हे तीन दिवसीय कॅस्केड



प्रशिक्षण आहे. या कार्यक्रमाच्या उद्घाटनाच्या वेळी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. सुभाष महाजन, अधिव्याख्याता ममता पवार, जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळाचे अध्यक्ष अनिल पाटील, शाळा विकास समिती सदस्य, नरेश पाटील, संजय गवारी, मोरे सर उपस्थित होते.

जिल्ह्यातील ६० गणित व विज्ञान प्राथमिक, माध्यमिक व साधनव्यक्ती यांनी प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग घेतला आहे. या प्रशिक्षणात सर्व सहभागी शिक्षकांना गणित व विज्ञान शिकविण्यास उपयोगी अशा उपक्रमांसाठी उपयोगी असे किट्स तसेच प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

## खालापुरात आयुष्मान भव योजनेचा शुभारंभ

**चौक, मोहोपाडा : प्रतिनिधी**

आयुष्मान भारत योजनेत सामील व्यक्ती देशातील कोणत्याही सरकारी व पॅनलमध्ये समाविष्ट खासगी रुग्णालयात मोफत उपचार घेऊ शकतो. जवळपास सर्वच आजारांवर शासन खर्च करेल अशी ही योजना आहे, अशी माहिती वैद्यकीय अधीक्षक डॉ. सविता कालेल यांनी सांगितले.

खालापूर तालुका वैद्यकीय अधिकारी व ग्रामीण रुग्णालय चौक यांच्या वतीने आयुष्मान भव योजनेचा शुभारंभ करण्यात आला. त्या वेळी डॉ. सविता कालेल बोलत होत्या. कार्यक्रमास तुपगावचे सरपंच रवी कुंभार, चौक सरपंच रितु ठोंबरे, नितीन मालुसरे, ऋषाली पोलेकर, प्रकाश जाधव, सिप्ला कंपनी व्यवस्थापन धुरी, डॉ.



चौरे उपस्थित होते.

तालुका वैद्यकीय अधिकारी रोकडे यांनी, आयुष्मान भव कार्डमुळे रुग्णालयात दाखल होताना कोणतीच फी भरावी लागणार नाही. आयुष्मान भव कार्ड काढताना आधार कार्ड, रेशन कार्ड, रहिवासी दाखला, मोबाईल नंबर असणे आवश्यक आहे. १३५० आजारांवर या कार्डमुळे इलाज करता येईल अशी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे, असे सांगितले.

या वेळी सिप्ला कंपनी यांच्या वतीने पौष्टिक आहार चे किट वाटण्यात आले. ग्रामीण रुग्णालयात काम करणारे कामगार, आरोग्य सेविका, परिचारिका, डॉक्टरांनी इरसाल दुर्घटनेत सेवा दिल्याने त्यांचा सन्मान सरपंच रितु ठोंबरे व सरपंच रवी कुंभार यांच्या हस्ते करण्यात आला.

# मराठा समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शासनाच्या योजना

मराठा समाजातील विद्यार्थ्यांना ओबीसींप्रमाणे शैक्षणिक सवलती, सुविधा दिल्या जातात. विद्यार्थ्यांच्या, युवा पिढीच्या प्रगतीसाठी छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे सारथीची स्थापना करण्यात आली आहे. शासनाच्या सर्व योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करून मराठा समाजाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. चला तर या लेखात मराठा समाजातील विद्यार्थ्यांना मिळालेल्या विविध लाभाची माहिती घेऊ या...

सारथी संस्थेमार्फत उच्च शिक्षणासाठी फेलोशीप, स्कॉलरशीप, एमपीएससी व युपीएससी व इतर स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण कार्यक्रम राबविला जातो. आतापर्यंत सुमारे १२ हजार विद्यार्थ्यांना ४४.५८ कोटी रुपये खर्च करून स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण देण्यात आले आहे. रोजगार व स्वयंरोजगारासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबवून २७ हजार ३४७ मराठा समाजातील विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आला. राज्यात सारथीचे आठ विभागीय कार्यालयासाठी कोल्हापूर, पुणे, नाशिक, खारघर, औरंगाबाद, लातूर, अमरावती, नागपूर शासनाने विनामुल्य जमिनी सारथीच्या ताब्यात दिल्या आहेत, तर मुख्यालयासाठी पुणे येथे जमिन उपलब्ध करून देण्यात आली आहे.

पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना, परदेशी विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी स्कॉलरशीप, छत्रपती शिवाजी महाराज संकुल अंतर्गत विभागीय कार्यालय, ३०० विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका, ५०० मुले व मुली यांच्यासाठी वसतीगृह, शेतकरी समुपदेशन केंद्र व कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र बांधण्यात येत आहे. आतापर्यंत वर्ग १ (७४), वर्ग २ (२३०) असे एकूण ३०४ मराठा समाजातील विद्यार्थ्यांची एमपीएससीमार्फत निवड झाली आहे.मराठी समाजातील १२ आयएएस, १८ आयपीएस, आठ आयआरएस, एक आयएफएस व १२ इतर सेवांमध्ये असे एकूण ५१ जणआंची निवड युपीएससीमार्फत झालेली आहे. एमफील व पीएचडीसाठी २१०९ विद्यार्थ्यांना लाभ दिला आहे. प्रति विद्यार्थी २० लाख रुपये पाच वर्षांसाठी फेलोशीपसाठी अनुदान दिले गेले आहे.

परदेशी शिक्षणासाठी ७५ गुणवंत विद्यार्थ्यांना स्कॉलरशीप दिली जाते.एमएससाठी प्रति वर्ष ३० लाख याप्रमाणे दोन वर्षांसाठी ६० लाख जर विद्यार्थी पीएचडी करीत असेल तर एक कोटी ६० लाख अनुदान दिले जाते. सारथीमार्फत छत्रपती शिवाजी महाराष स्मृती ग्रंथाच्या ५० हजार प्रती प्रकाशित करून विविध ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परीषद, नगरपालिका, महापालिका, माध्यमिक शाळा, शासकीय कार्यालयात वितरीत करण्यात आल्या आहेत. युपीएससीच्या तयारीसाठी मराठा समाजातील ५०० विद्यार्थ्यांना दरवर्षी दिल्ली व पुणे येथे प्रशिक्षण देण्यात येते. त्याचबरोबर एमपीएससीसाठी ७५० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते. आयबीपीएस, नेट-सेट परिक्षेसाठी प्रशिक्षण दिले जाते. एकूण २४६४ विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण सुरू आहे.

मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह सुविधा, शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती, शिष्यवृत्ती, स्पर्धा परिक्षांमध्ये वयात सवलत व परिक्षा शुल्क सवलत, याप्रमाणे फायदे दिले जातात. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळामार्फत स्वयंरोजगार व उद्योगासाठी बँकामार्फत घेतलेल्या कर्जावरील व्याजाचा परतावा केला जातो. एकूण ६७ हजार १४८ बँक कर्ज लाभार्थ्यांना ४८५० कोटींचे कर्ज वितरीत करण्यात आलेले आहे. ५५ हजार ५१७ लाभार्थ्यांचा व्याज परतावा सुरू झालेला आहे. आतापर्यंत व्याज परताव्यापोटी लाभार्थ्यांना ५१६ कोटींचे अर्थसहाय्य देण्यात आले आहे. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळास दरवर्षी ३०० कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला जातो. मनुष्यबळ व निधी मध्ये कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही.

सारथीला ३०० कोटींचा निधी दरवर्षी उपलब्ध करून दिला जातो. मनुष्यबळ व निधी मध्ये कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही. १५५३ अधिसंख्यपदे निर्माण करून उमेजवारांना रुजू करून घेण्यात आले, तसेच २००० विद्यार्थ्यांना रखडलेली नोकरभरती कार्यवाही पूर्ण करून सेवेत रुजू करून घेण्याचा निर्णय घेण्यात आला. असे एकूण ३५५३ जणांना शासकीय सेवेत सामावून घेण्यात आले. अशा विविध पद्धतीने सारथी मार्फत मराठा समाजातील विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी, आर्थिक सक्षमीकरणासाठी व्यापक स्वरुपात उपक्रम, योजना राबविण्यात येत आहे.

**-संजीवनी जाधव-पाटील,**
**सहाय्यक संचालक (माहिती),**
**कोकण विभाग, नवी मुंबई**

## शांतता समिती अशासकीय सदस्यपदी वेळासकर

**माणगाव : प्रतिनिधी**

खासदार सुनील तटकरे यांच्या आदेशाने रायगड जिल्हा शांतता समितीवर अशासकीय सदस्यपदी मुक्तार वेळासकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीबद्दल मुक्तार वेळासकर यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

मुक्तार वेळासकर सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जातात. समाजाच्या उन्नतीसाठी त्यांची नेहमीच धडपड व तळमळ राहिली आहे. त्यांच्या या कार्यामुळे त्यांची रायगड जिल्हा शांतता समितीवर अशासकीय सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

# जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत ‘सीकेटी’चे वर्चस्व



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय आणि पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने नावडे येथे झालेल्या जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेमध्ये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले आहे.

सिद्धेश धनाजी तांडेल, यश कृष्णा पाटील, नवनाथ बालाजी गंगन माले यांनी प्रथम क्रमांक, तर वेदांत संजय कणसे, राज रूपेश म्हात्रे, हर्षवर्धन प्रशांत पाटील यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला. या सर्वांचे कौतुक होत आहे. सीकेटी विद्यालयाचे विद्यार्थी अभ्यासाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही नावलौकिक मिळवित असल्याचे दिसून येत आहे.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, स्वाती पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयाने जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत यश संपादन केले आहे.

१७ वर्षाखालील मुलींमध्ये सीकेटी विद्यालय मराठी माध्यमिक विभागाची विद्यार्थिनी दक्षता प्रकाश रिसबुड (इ. नववी) हिने ६१ किलो वजन गटात प्रथम मांक प्राप्त केला. महिमा संजय महाडिक (इ. नववी) हिने ६५ किलो वजन गटात प्रथम मांक प्राप्त केला. या विद्यार्थिनींची मुंबई विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे यांनी यशस्वी विद्यार्थिनींचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले व पुढील मुंबई विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## आयसीसी वनडे क्रमवारीत शुबमन, कुलदीपची मुसंडी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आशिया चषक स्पर्धेत चमकदार कामगिरी करणारे भारतीय क्रिकेट संघाचे खेळाडू शुबमन गिल आणि कुलदीप यादव यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) एकदिवसीय क्रमवारीत मोठी झेप घेतली आहे. आशिया कपमध्ये दोन अर्धशतकांसह १५४ धावा करणारा भारताचा युवा फलंदाज शुबमन गिल त्याच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम दुसऱ्या क्रमांकावर पोहचला आहे, तर या स्पर्धेत आतापर्यंत नऊ विकेट्स घेणारा भारताचा अनुभवी फिरकीपटू कुलदीप यादवचेही पाच स्थानांनी प्रमोशन झाले असून तो सातव्या स्थानी आला आहे.

फलंदाजीत अव्वल स्थानावर असलेल्या पाकिस्तानच्या बाबर आझमचे ८६३ गुण आहेत, तर शुभमन ७५९ रेटिंगसह १०३ गुणांनी मागे आहे. त्याच्या व्यतिरिक्त विराट कोहली आणि रोहित शर्मा यांनाही प्रत्येकी दोन स्थानांचा फायदा झाला आहे. दोन्ही दिग्गज पहिल्या १० फलंदाजांमध्ये दाखल झाले आहेत. विराट आठव्या आणि रोहित नवव्या स्थानावर आहे. तब्बल साडेचार वर्षांनंतर प्रथमच भारताच्या तीन फलंदाजांना आयसीसी क्रमवारीत पहिल्या दहामध्ये स्थान मिळवण्यात यश आले आहे.

### रोहा तालुकास्तरीय खो खो स्पर्धा

# मुलांमध्ये सानेगाव, मुलींमध्ये खांब शाळा विजेती

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा धाटाव औद्योगिक विद्यालयात तालुकास्तरीय खो खो स्पर्धेचा थरार पहायला मिळाला. स्पर्धेत तालुक्यातील २५ शाळा सहभागी झाल्या असून १४, १७ व १९ वयोगटातील ६० संघांनी आपला सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेत सानेगाव येथील सानेगुरुजी विद्यानिकेतन मुलांमध्ये प्रथम, तर रा. ग. पोटफोडे मास्तर खांब शाळा मुलींमध्ये प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले.



(छाया : जितेंद्र जाधव)

स्पर्धेवेळी धाटाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच अशोक मोरे, धाटाव औद्योगिक विद्यालयाचे मुख्याध्यापक डी. एस. पाटील, गोरीवले, सुरेश जंगम, मधुकर फसाळे अडसूळ, पानसरे, दीपक जगताप, क्रीडा समन्वयक रवींद्र कान्हेकर, क्रीडा शिक्षक सचिन महाडिक, सुधीर जंगम, मीनानाथ गावंड, विशाल शिंदे, ज्ञानेश्वर पोटफोडे, अमोघसिद्ध सुरवसे, सुनील थिटे, विनायक चितलकर, निलेश बिरगावले, गोविंद कवलगे, नरेश महाडिक, समिता वाघमारे, श्रद्धा पाटील, योगेश धुमाळ, नितीश म्हात्रे, शिवाजी मेंढे, मंगेश कुर्ले, संघ व्यवस्थापक, सहकारी शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्पर्धेत पंच म्हणून विशाल शिंदे, मीनानाथ गावंड, सुधीर जंगम, सचिन महाडिक, तुषार ठमके, राज देशमुख, विक्रांत शिंदे यांनी काम पाहिले.तालुका समन्वयक रवींद्र कान्हेकर यांनी त्यांचा सन्मान केला.

**गटनिहाय निकाल**

१४ वर्षे वयोगट : मुली– रा. ग. पोटफोडे मास्तर विद्यालय खांब प्रथम, एमपीएससी कोलाड द्वितीय, मुले– साने गुरुजी विद्यानिकेतन सानेगाव प्रथम, शासकीय आश्रमशाळा सानेगाव द्वितीय; १७ वर्षे वयोगट : मुली– रा. ग. पोटफोडे मास्तर विद्यालय खांब प्रथम, द. ग. तटकरे माध्यमिक विद्यालय विरजोली द्वितीय, मुले–साने गुरुजी विद्यानिकेतन सानेगाव प्रथम, शासकीय आश्रमशाळा सानेगाव द्वितीय, १९ वर्षे वयोगट : मुली–जिंदल माऊंट लिटर जी स्कूल सुकेळी प्रथम, मेंहदळे हायस्कूल रोहा द्वितीय.

## रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांची कुस्ती स्पर्धेत चमक

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले आहे.

राज्य क्रीडा व युवक संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय आणि पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने मुलांच्या शालेय जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन नावडे येथील प. जो. म्हात्रे विद्यालयाच्या मैदानावर करण्यात आले होते.

या स्पर्धेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या अरमान भाटकर (इ. बारावी) याने १९ वर्षाखालील गटात प्रथम, अपूर्व ठाकूर (इ. नववी), कार्तिक कुट्टी व नंदगोपान एस. ई. (इ. दहावी), आर्यन पाटील (इ. आठवी) यांनी १७ वर्षाखालील गटात तृतीय क्रमांक पटकाविला.

या विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणारे मंदार मुंबईकर यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी यांनी कौतुक व अभिनंदन केले.



# रामशेठ ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत यश

**खारघर : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय आणि पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने मुलांच्या शालेय जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन नावडे येथील प. जो. म्हात्रे विद्यालयाच्या मैदानावर करण्यात आले होते. या स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर ओवेपेठ येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले.



ग्रिको रोमन १७ वर्षाखालील व ५५ किलो गटात रोशन गुरूनाथ खांदेकर (इ. आठवी) याने प्रथम, ६० किलो गटात आदर्श दशरथ घरत (इ. आठवी) याने व्दितीय, फ्रिस्टाईल १७ वर्षाखालील व ६० किलो गटात राहुल कालुचरण सिंग (इ. नववी) याने व्दितीय, ८० किलो गटात अजित राजेंद्र झिने (इ. नववी) याने व्दितीय क्रमांक पटकाविला.

१९ वर्षाखालील व ६१ किलो गटात वेदांत अविनाश गायकवाड (इ. बारावी कॉमर्स) याने व्दितीय, ७४ किलो गटात आनंद धोंडू पराते (इ. बारावी सायन्स) व्दितीय, ६१ किलो गटात जय ठाकूर (इ. बारावी सायन्स) तृतीय आणि ६५ किलो गटात शिवसुंदर रमेशचंद्र साहू (इ. बारावी कॉमर्स) याने तृतीय क्रमांक प्राप्त केला. या विद्यार्थ्यांची मुंबई विभागीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. त्यांना क्रीडाशिक्षक प्रवीण पाटील, संभाजी जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, विद्यालयाच्या प्राचार्य निशा नायर व माध्यमिक विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक संतोष खांदेकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि शुभेच्छा दिल्या.

## नवीन हक वर्ल्डकप संघात

**काबूल : वृत्तसंस्था**

अफगाणिस्तानने विश्वचषक स्पर्धेसाठी आपला १५ सदस्यीय संघ जाहीर केला आहे. यामध्ये नवीन–उल–हकला स्थान मिळाले आहे. आयपीएलमध्ये त्याचा भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीशी वाद झाला होता. त्यामुळे वर्ल्डकपमध्ये विराट आणि नवीन आमनेसामने येतील.

नवीनला अफगाणिस्तान बोर्डाने आशिया कपमध्ये संधी दिली नाही. त्यानंतर विश्वचषक स्पर्धेत पुनरागमन करणे कठीण होईल, अशी अटकळ बांधली जात होती, मात्र अफगाणिस्तान क्रिकेटने विश्वचषकात नवीनची निवड करून सर्वांनाच आश्चर्यचकित केले आहे.






## हर्षिता वायंगणकरला राष्ट्रीय मल्लखांब स्पर्धेत सुवर्णपदक

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र एनसीसीच्या कॅडेटपैकी बोरीवली पूर्व येथील मल्लखांब खेळाडू हर्षिता राकेश वायंगणकर हिने राष्ट्रीय खेलो इंडिया मल्लखांब स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. याबद्दल महाराष्ट्राचे क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी हर्षिताला विशेष पारितोषिक देऊन तिचा गौरव केला.

### क्रीडामंत्र्यांकडून सत्कार



राकेश वायंगणकर यांच्या नेतृत्वाखाली बोरीवली पूर्व येथील जय महाराष्ट्र नगर येथे वायंगणकर साई स्पोर्ट्स असोसिएशन कार्यरत असून राकेश वायंगणकर व पल्लवी वायंगणकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या कन्या हर्षिता आणि रुचिता या दोन्ही भगिनींना राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील अनेक पारितोषिके मिळाली आहेत.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, मुख्य संपादक : देवदास मटाले. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com